भगवत् गीता पा-वा
८००

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय पा-वा.
दा. क्र. ८००

दोन शब्द

कुमारवयातील मोठ्या मुलांसाठी ही 'मुलांची गीता' आहे. या मुलांना गीता समजली पाहिजे व तिच्यातील सुंदर चरण त्यांच्या मुखात घोळले पाहिजेत असे सर्वांनाच वाटते. पण त्यासाठी ती त्यांना आवडेल व पुन्हा पुन्हा वाचावीशी वाटेल, अशा आकर्षक स्वरूपात मांडली पाहिजे. या दिशेने हा अल्पसा व नवा प्रयत्न आहे.

मोठी मुले गंभीर स्वरूपाचे वाचनही करीत असतात— विचार गोळा करीत असतात. गीतेतील श्लोक कल्पनाविस्ताराच्या स्वरूपात वाचणे त्यां सोपे वाटेल व शिवाय त्यांच्या संस्कृत भाषेच्या ज्ञानास मदत होईल.

ब्रह्म, माया, योग इत्यादि अवघड गोष्टी मुलांना काय उपयोगी ? पण गीतेत काय आहे हे तरी त्यांना माहीत पाहिजेच. चातुर्वर्ण्य, जातिभेद, युद्ध, अहिंसा, समतावाद, शिक्षण इत्यादि विषय आज जिव्हाळ्याचे आहेत व गीतेत ते चर्चिले आहेत.

वि. कृ. श्रोत्रिय

BVBK-0400900

—२—

क्षत्रियांचे कर्तव्य

शौर्यं तेजो धृतिः दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानम् ईश्वरभावः च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ (१८.४३)

(शूरपणा, तेजस्वीपणा, धीरता, तत्परता, युद्धातून पळून न जाणे, दान करणे व सत्ता धारण करणे हे क्षत्रियांचे स्वाभाविक कर्म होय.)

आपल्या बंधुजनांना युद्धात ठार करण्याचा धीर अर्जुनाला होत नव्हता. आपले शौर्य, तेज, कर्तव्यतत्परता व राजसत्ता परत घेण्याची इच्छा हे क्षत्रियांचे स्वाभाविक गुण व कर्तव्य तो विसरला होता. म्हणून त्याची जाणीव त्याला श्रीकृष्णाने करून दिली आहे. राजकारणी माणसांनी ह्या गुणांची जोपासना केली तरच देशाचे राजकारण सुरळितपणे चालेल. युद्ध खरोखर वाईटच व म्हणून ते टाळण्यासाठी श्रीकृष्णाने शिष्टाईही केली होती. पण ती निष्फळ होऊन युद्ध अटळ झाले.

आता मागे पाय घेणे ह्या पळपुटेपणा ठरला असता. आक्रमक युद्ध व हिंसा ही वाईट — तामसी — हे गीतेतच सांगितले आहे. पण हे न्यायाचे 'धर्म्य' युद्ध होते व त्यात प्राणपणाने लढणे हे वीराचे कर्तव्यच होते.

वीराला राजसत्ता हवीच. पण ती चैनीसाठी किंवा दुसऱ्यांवर गाजविण्यासाठी नाही. प्रजापालनासाठी व दान करता यावे म्हणून. भारतीय राजकारण असे धर्मनिष्ठ होते. केवळ सत्तेचे राजकारण नव्हते.

★

लढाईला भिऊ नका

युद्धे चाप्यपलायनम् । (१८.४३)

(लढाईच्या वेळी पळून न जाणे हे क्षत्रियांचे स्वाभाविक कर्तव्य होय.)

श्रीकृष्णाने शिष्टाई करून युद्ध टाळण्याचा खूप प्रयत्न केला, पण दुर्योधन तडजोडीला मुळीच तयार नव्हता. 'पाच गावे काय, पण सुईच्या टोकावर मावेल इतकीही जमीन मी देणार नाही' असे त्याने म्हटल्यावर युद्धाखेरीज गत्यंतरच नव्हते. त्याच्या उद्दामपणाला धडा द्यायलाच हवा होता.

सज्जनांचे रक्षण करण्यासाठी दुर्जनाशी लढायची पाळी येते. त्यावेळी दया उपयोगी नाही. ती केली तर सज्जन बळी पडतात व तो निर्दयपणा ठरतो.

अर्जुनासारख्या वीर पुरुषांचे – क्षत्रियांचे – कर्तव्य हेच ठरते की युद्धाला तोंड देऊन सज्जनांचे रक्षण करावे. ते टाळणे हा अधर्म ठरतो.

सामान्य माणसाला जीवनाशी झगडावे लागते. (जीवन म्हणजे अडचणींशी सतत झगडणे.) साऱ्या थोर पुरुषांनी असा लढा दिला म्हणून ते यशस्वी ठरले. संकटांपुढे नमणे – माघार घेणे म्हणजे पळपुटेपणा – भेकडपणा, मरणच ते एक प्रकारचे. ' Cowards die many times before their death. ' भेकड माणसे जणु पदोपदी मरत असतात. 'शेळी होऊन दोनशे वर्षे जगण्यापेक्षा वाघ होऊन दोन दिवस जगणे बरे,' असे टिपू सुलतान म्हणे.



अनुक्रम

	पान
१. युद्ध	५
२. आत्मा अमर आहे	११
३. आत्मोद्धार	१६
४. समबुद्धी	२२
५. कर्मयोग	३५
६. स्वधर्म	५७
७. ज्ञान	६४
८. बुद्धी	७४
९. भक्ती	७८
१०. ईश्वर	८७
११. सुख व सदाचार	१००
१२. माया	११०
१३. गीता-सुभाषिते	१११
१४. श्लोकांची सूची	११३
१५. शुद्धिपत्रक	११५
१६. पसायदान	११६

* *

१. युद्ध

—१—

एतान् न हन्तुमिच्छामि।

एतान् न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते॥ (१.३५)

(आम्हाला हे मारीत असताही, हे मधुसूदना, त्रैलोक्याच्या राज्यासाठीदेखील मी यांना मारू इच्छीत नाही; मग केवळ पृथ्वीच्या राज्यासाठी का मारू?)

अर्जुन फार थोर मनाचा होता. बांधवांना मारून आपण सुखी होणार नाही, अशी त्याची खात्री होती. युद्धानंतर असेच झाले. पांडव विरक्त होऊन हिमालयापलीकडे गेले व आपले जीवन त्यांनी संपविले. महाभारताचा हा मानवाला—युद्धपिपासू जगाला हाच अखेरीचा संदेश आहे.

कौरव आपल्याला मारायला आले म्हणून त्यांना आपण मारावे, असे त्या उदार हृदयाच्या वीराला वाटले नाही. स्वजनांना मारून आम्ही कसे सुखी होऊ, (स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव।) असा अवघड प्रश्न त्याने श्रीकृष्णाला विचारला. (१.३७)

ज्यांनी धनुर्विद्या शिकविली त्या पूजनीय गुरूवर बाण कसे सोडावे? कृतघ्नपणाच ठरेल तो. त्यापेक्षा भीक मागण्याची पाळी येणे बरे. गुरूंच्या रक्ताने माखलेले सुखोपभोग भोगण्याची इच्छा त्याला कशी होणार? श्रीकृष्णाने त्याला 'भ्याड' म्हटले पण ते त्याला डिवचण्यासाठी. अर्जुन नेभळा, मरणाला भिणारा नव्हता. कोणाही सज्जनाला पडावा असा पेच त्याला पडला होता.

BVBK-0400900

–२–

क्षत्रियांचे कर्तव्य

शौर्यं तेजो धृतिः दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानम् ईश्वरभावः च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ (१८.४३)

(शूरपणा, तेजस्वीपणा, धीरता, तत्परता, युद्धातून पळून न जाणे, दान करणे व सत्ता धारण करणे हे क्षत्रियांचे स्वाभाविक कर्म होय.)

आपल्या बंधुजनांना युद्धात ठार करण्याचा धीर अर्जुनाला होत नव्हता. आपले शौर्य, तेज, कर्तव्यतत्परता व राजसत्ता परत घेण्याची इच्छा हे क्षत्रियांचे स्वाभाविक गुण व कर्तव्य तो विसरला होता. म्हणून त्याची जाणीव त्याला श्रीकृष्णाने करून दिली आहे. राजकारणी माणसांनी ह्या गुणांची जोपासना केली तरच देशाचे राजकारण सुरळितपणे चालेल. युद्ध खरोखर वाईटच व म्हणून ते टाळण्यासाठी श्रीकृष्णाने शिष्टाईही केली होती. पण ती निष्फळ होऊन युद्ध अटळ झाले.

आता मागे पाय घेणे हा पळपुटेपणा ठरला असता. आक्रमक युद्ध व हिंसा ही वाईट – तामसी – हे गीतेतच सांगितले आहे. पण हे न्यायाचे ‘ धर्म्य ’ युद्ध होते व त्यात प्राणपणाने लढणे हे वीराचे कर्तव्यच होते.

वीराला राजसत्ता हवीच. पण ती चैनीसाठी किंवा दुसऱ्यांवर गाजविण्यासाठी नाही. प्रजापालनासाठी व दान करता यावे म्हणून. भारतीय राजकारण असे धर्मनिष्ठ होते. केवळ सत्तेचे राजकारण नव्हते.

★

लढाईला भिऊ नका

युद्धे चाप्यपलायनम् । (१८.४३)

(लढाईच्या वेळी पळून न जाणे हे क्षत्रियांचे स्वाभाविक कर्तव्य होय.)

श्रीकृष्णाने शिष्टाई करून युद्ध टाळण्याचा खूप प्रयत्न केला, पण दुर्योधन तडजोडीला मुळीच तयार नव्हता. 'पाच गावे काय, पण सुईच्या टोकावर मावेल इतकीही जमीन मी देणार नाही' असे त्याने म्हटल्यावर युद्धाखेरीज गत्यंतरच नव्हते. त्याच्या उद्दामपणाला धडा द्यायलाच हवा होता.

सज्जनांचे रक्षण करण्यासाठी दुर्जनाशी लढायची पाळी येते. त्यावेळी दया उपयोगी नाही. ती केली तर सज्जन बळी पडतात व तो निर्दयपणा ठरतो.

अर्जुनासारख्या वीर पुरुषांचे – क्षत्रियांचे – कर्तव्य हेच ठरते की युद्धाला तोंड देऊन सज्जनांचे रक्षण करावे. ते टाळणे हा अधर्म ठरतो.

सामान्य माणसाला जीवनाशी झगडावे लागते. (जीवन म्हणजे अडचणींशी सतत झगडणे.) साऱ्या थोर पुरुषांनी असा लढा दिला म्हणून ते यशस्वी ठरले. संकटांपुढे नमणे – माघार घेणे म्हणजे पळपुटेपणा – भेकडपणा, मरणच ते एक प्रकारचे. 'Cowards die many times before their death.' भेकड माणसे जणु पदोपदी मरत असतात. 'शेळी होऊन दोनशे वर्षे जगण्यापेक्षा वाघ होऊन दोन दिवस जगणे बरे,' असे टिपू सुलतान म्हणे.

युद्ध ही संधी आहे

धर्म्याद्धि युद्धात् श्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते ।

(२.३१)

(धर्मासाठी – म्हणजे न्यायासाठी – जे युद्ध असते त्याहून अधिक कल्याणकारक असे दुसरे काहीही क्षत्रियाला – म्हणजे वीराला – नसते.)

युद्ध म्हणजे संकट. संकटात माणसाच्या पराक्रमाची – बळाची परीक्षा होते. त्याचे धैर्य, चिकाटी, सहनशीलता, निःस्वार्थी वृत्ती, त्याग, शक्ती, कौशल्य हे सर्व गुण कसाला लावले जातात. मात्र हे युद्ध धर्मासाठी–न्यायासाठी – लोककल्याणासाठीच असले पाहिजे.

संकटांना भिऊन माघार घेणे म्हणजे भ्याडपणा. मरणाहून मरणच ते एक प्रकारे. [संकटे नसती तर थोर कोण, वीर कोण हे जगाला समजले नसते. जगावर उपकार करण्याची संधीही थोरांना मिळाली नसती. संकटांत केवळ गुणांची पारखच होत नाही तर ते सतत वापरात येऊन वाढीला लागतात. संकटे म्हणजे व्यक्तित्वाच्या विकासाचे खतपाणीच होय.]

जीवनात सतत लढाच असतो. लढा संपला तर जीवनच संपले. म्हणून न्यायासाठी, समाजहितासाठी युद्ध ही माणसाची संधी आहे. प्राणार्पण करून हुतात्मा होण्याची ही संधी आहे. वीराला याहून मोठी संधी नाही.

★

—५—

वीराचे भाग्य

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
(२.३७)

(हे अर्जुना, तू युद्धात मारला गेलास तर स्वर्ग प्राप्त करशील
किंवा जिंकल्यावर पृथ्वीवरील सुखे भोगशील.)

युद्धामध्ये जे मारले जातात त्यांना देव मानून त्यांची पूजा होते. ' चिरंजीव त्यांचे जगी नाम राहो ' असे गौरवाचे लेख त्यांच्या स्मारकांवर खोदले जातात. युद्धात त्यांनी देशासाठी – इतरांच्या कल्याणासाठी – आपले प्राण समर्पण केलेले असतात.

। पराक्रमाची शर्थ करून मरणे हे अपयश नव्हे तर महान यशच होय.। जीवनाची कृतकृत्यता होय. स्वर्ग तो हाच. इतरांस सुखी करणे – त्यांच्या सर्वांच्या एकत्रित महान सुखात आपले सुख पाहणे म्हणजे स्वर्गसुखच.

प्राणपणाने संकटांशी झगडून जिंकले तर जे यश पदरी पडते त्याचा प्रत्यक्ष फायदा होतोच. आपले साध्य गाठले जाते व आपल्या जीवनात आपण सुखी होतो. म्हणून अपयशाला भिऊ नये. जगात वीर म्हणून जगावे व मरावे. ' Be a hero in the strife. '



–६–

यशाचे रहस्य

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ (१८.७८)

(जेथे योगिश्रेष्ठ कृष्ण आहे, जेथे धनुष्यधारी– योद्धा– अर्जुन आहे, तेथे संपत्ती, जय, सतत टिकणारी भरभराट व नीती – धोरण – ही आहेत असे माझे मत आहे.)

जीवनाचा लढा यशस्वीपणे लढावयाचा तर अंगी पराक्रम हवाच. परंतु त्याच्यामागे मनात ज्ञानाची भक्कम बैठक – म्हणजेच योग पाहिजे. ज्ञानावाचून खरे कर्तृत्व गाजत नाही. मार्ग पक्का माहीत असला तरच त्यावर प्रगतीची निश्चित पावले पडतात. ज्ञानमूलक कर्मयोग तो हाच.

आपण करतो ते न्यायाचे आहे, त्याचा परिणाम आपल्या व जगाच्या हितातच होणार आहे, ह्या जाणिवेमुळे नैतिक धैर्य निर्माण होते, माणूस सर्व शक्ती पणास लावून कार्य करतो. अशा माणसाच्या पाठीशी दैवी शक्ती असते. तो जीवनाच्या लढ्यात विजयी ठरणारच. त्याची सतत भरभराटच होणार.

नीतीने वागणाराचा पाठिराखा परमेश्वर असतो. नीती व पराक्रम ह्यांची सांगड हेच यशस्वी जीवनाचे रहस्य.



२. आत्मा अमर आहे.

—७—

नायं हन्ति न हन्यते ।

य एनं वेत्ति हन्तारं यश्च एनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ (२·१९)

(हा आत्मा मारणारा आहे असे जो समजतो, आणि जो हा मारला गेला असे मानतो, त्या दोघांनाही कळत नाही. हा आत्मा कोणाला मारीत नाही व कोणाकडून मारला जात नाही.)

युद्धात बांधवांना व गुरुजनांना मारावे लागणार म्हणून अर्जुनाला दुःख झाले व तो युद्धाला उभा राहीना. ‘ युद्धामध्ये तू मारणार ती शरीरे—आत्मे नव्हेत ’, असे म्हणून त्याचे समाधान करण्यासाठी श्रीकृष्णाने अर्जुनाला हे तत्त्वज्ञान सांगितले आहे. या खोल तत्त्वज्ञानाशिवाय अर्जुनाचे समाधान झालेच नसते.

जगात मरतात ती शरीरे—आत्मे अमर असतात. तसेच मारणारे हात म्हणजे शरीर असते. आत्मा कोणाला मारू शकत नाही. आत्मा काहीच करीत नसतो. तो नुसता देहात राहून सुखदुःख भोगणारा असतो.

जगात कोणीही कोणाला मारावे—तो खुनी ठरणार नाही, असा यातून अर्थ काढू नये. आपली काहीच चूक नसता केवळ कर्तव्य म्हणून जेव्हा दुसऱ्यास मारणे भाग पडते तेव्हा मनाचे समाधान ह्या खोल तत्त्वज्ञानाने होते.

वासांस जीर्णानि यथा विहाय

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरो अपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णानि
अन्यानि संयाति नवानि देही ॥ (२·२२)

(ज्याप्रमाणे जुनी फाटकी वस्त्रे टाकून मनुष्य दुसरी नवी घेतो, त्याप्रमाणे देहात राहणारा आत्मा जुनी म्हातारी शरीरे टाकून दुसऱ्या नवीन शरीरांत जातो.)

मरणाला माणूस अवास्तव महत्त्व देतो. मरण ही एक स्वाभाविक गोष्ट आहे. 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ।' असे सुभाषित आहे. मरणात दुःख वाटण्यासारखे काय आहे ? मरण आत्म्याचे नसते-देहाचे असते.

देह म्हणजे आत्म्याने घातलेले कपडेच जणू. कपडे जुने झाले व फाटले तर कोणी रडत बसत नाही. उलट, आनंदाने नवे कपडे घालतो. आत्म्यालाही नवा जन्म-नवा देह-मिळाल्यावर, असेच वाटत असेल. देह हे साधन आहे. नीट चालेल तोवर वापरले-जुने झाले की फेकून दिले.

आपण देहावर प्रेम करतो म्हणून मरणाचे दुःख वाटते. देहभाव गेला, मी म्हणजे आत्मा आहे असे ज्ञान झाले की माणूस मरणापार गेला.

卐

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि ।

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न च एनं क्लेदयन्ति आपः न शोषयति मारुतः ॥

(या आत्म्याला शस्त्रे कापू शकत नाहीत. याला अग्नी जाळू शकत नाही. आणि याला पाणी भिजवीत नाही, वारा सुकवीत नाही.)

शस्त्रांनी मारले जाते ते शरीर. रणांगणात ठार झालेले वीर म्हणूनच अमर होतात. आत्मा अमर आहे. हुतात्मे तर याशिवाय स्मृतिरूपाने जगात अमर राहतात. त्यांचे जीवन इतरांस स्फूर्ती देते. माणूस मेल्यावर दहन होते ते त्याच्या शरीराचे· आत्मा त्यात नसतोच.

अग्नी, वारा पाणी ही पंचमहाभूतांपैकी नाशक अशी होत. आगीत माणसे होरपळतात, घरे जळून खाक होतात. वादळी वाऱ्याने वृक्ष उन्मळून पडतात. पुराच्या पाण्यात बुडून माणसे मरतात. पृथ्वीवरील कडे कोसळून त्याखाली माणसे मुंग्यांसारखी चिरडली जातात–जणु शस्त्रांच्या प्रहारांनीच.

निसर्गाची ही शक्ती आत्म्यापुढे चालत. नाही· आत्मा म्हणजे चैतन्य–प्रत्यक्ष परमेश्वरच. जड सृष्टी त्याला काय मारू शकणार ?

‘ **नैनं छिन्दन्ति शस्त्राणि ।** ’ ह्या तत्त्वावर श्रद्धा ठेवूनच हाती गीता घेऊन काही देशभक्त हसत फासावर चढले. ही श्रद्धा असल्यावर जगात माणसाला कशाचीही भीती नाही.

—१०—

मरण ते जनन

देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिः धीरः तत्र न मुह्यति ॥ (२·१३)

(देह धारण करणाऱ्या आत्म्याच्या देहात ज्याप्रमाणे बाल्य, तारुण्य व म्हातारपण ह्या दशा प्राप्त होतात, त्याप्रमाणेच मृत्यू-नंतर त्याला दुसरा देह प्राप्त होतो. म्हणून याविषयी ज्ञानी मनुष्य गोंधळून जात नाही.)

मरण म्हणजे खरोखर काय हे अज्ञानी माणसास समजत नाही. त्याला वाटते की मृत्यू हा प्राण्याचा नाश आहे. पण ज्ञानी माणूस मृत्यूला असे महत्त्व देत नाही व म्हणून त्याचा शोकही करीत नाही.

आत्मा अमर आहे व म्हणून आत्म्याबद्दल शोक करू नये हे ठीक; पण शरीर तर मरते ना ? त्याबद्दल शोक करणे योग्य आहे, असे म्हणता येणार नाही. कारण, मरण ही एक जीवाची अवस्था आहे. बालकाचा तरुण झाला किंवा तरुणाचा म्हातारा झाला म्हणजे बाल्य संपते, तारुण्य संपते—जीव संपत नाही. तसेच म्हातारपण संपणे व दुसरे शरीर प्राप्त होणे ही गोष्ट होय. मरण म्हणजे जीवाचा नाश नव्हे तर उलट देहान्तरप्राप्ती होय—आपल्या फायद्याची गोष्टच होय.



जातस्य हि ध्रुवो मृत्युः ।

जातस्य हि ध्रुवो मृत्युः ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्माद् अपरिहार्ये अर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ (२·२७)

(जन्मलेल्याचा मृत्यू ठरलेलाच आहे आणि मेलेल्याचा पुनर्जन्म ठरलेला आहे. म्हणून टाळता येण्यास अशक्य अशा या गोष्टीविषयी तू शोक करणे योग्य नाही.)

लढाईत आपल्या हातून मरण पावणार असलेल्या बांधवांबद्दल थोर अंतःकरणाच्या अर्जुनाला साहजिकच शोक झाला. त्याचे सांत्वन भगवान् श्रीकृष्णाने मोठ्या कळकळीने केले आहे.

जो जन्मला तो कधीतरी मरणारच. अमरपट्टा घेऊन कोण जगात आला आहे? पण जो मरण पावला तो पुन्हा जन्मण्यासाठीच हे जाणून आपण समाधान मानले पाहिजे. जो गेला त्याला दुसरा जन्म मिळणारच. आत्म्याची यात्रा सतत चालू आहे. मरणाचा टप्पा ओलांडून तो पुढचा नवीन टप्पा गाठणार आहे. त्याचे पाऊल अखंड पुढे पडणार आहे.

'शोक केल्याने मरण थोडेच टळणार? गेलेले माणूस रडून थोडेच परत येणार आहे?' असे समाधान शोक करणाराचे नेहमी केले जाते. शोक ही भावना आहे. विचाराने भावनेला आवरावे लागते. ज्याचा उपयोग नाही ते करणे योग्य नाही, हा विचार विचारी माणसाने करावा.

प्रियजनांच्या मरणाचा शोक हे जगातले सर्वात मोठे दुःख. ह्या प्रसंगी गीतेने हा विचार सांगून अखिल मानव जातीचे सांत्वन केले आहे.

३. आत्मोद्धार

–१२–

उद्धरेद् आत्मना आत्मानम् ।

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ (६.५)
(आपणच आपला उद्धार करावा. आपला नाश करून घेऊ नये.
आपणच आपले बंधू व आपणच आपले शत्रू असतो.)

देवा, मला प्रपंचातून सोडव-माझा उद्धार कर, मला मोक्ष दे अशी भक्त प्रार्थना करतात व देवही ' मी तुझा उद्धार करीन-तुला मोक्ष देईन, ' असे वचन देतो. पण हा भक्तीचा-प्रेमाचा – भाग आहे.

खरे म्हणजे देव आपल्याला केवळ बुद्धी म्हणजे प्रेरणा देतो. ददामि बुद्धि-योगंतम् । असे श्रीकृष्ण सांगतात (अ.१०·१०). तिचा उपयोग करून आपणच आपला उद्धार करून घेतला पाहिजे.

आपल्याला मदत करणारे किंवा आपला नाश करणारे आपले मित्र किंवा शत्रू आपणच असतो. दुसऱ्यावर–गुरूवर किंवा देवावरही–भार टाकू नये किंवा दुसऱ्याला दोषही देऊ नये. आत्मनिरीक्षण करावे व आपले कोठे चुकते ते पाहावे. ' नाचता येईना अंगण वाकडे ' म्हणू नये. A bad workman quarrels with his tools.

आपण आपल्या मनावर ताबा मिळविणे हाच आत्मोद्धाराचा मार्ग. त्यामुळेच आपले कल्याण होईल. तो ताबा जाऊन वाटेल तसे वागण्यात नाश आहे. तो आपण करून घेऊ नये. दैवाला दोष देऊ नये. दैवावर विसंबू नये. स्वतः श्रम केल्यावाचून देव साहाय्य करीत नाही. न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः । God helps those who help themselves.

मन हे ओढाळ गुरूं

इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः । (२.६०)

(अतिशय खळबळ माजविणारी इंद्रिये माणसाचे मन जोराने ओढून नेतात.)

डोळे, नाक, कान, जीभ व त्वचा ही आपली पाच ज्ञानेंद्रिये. बाह्य जगाचे ज्ञान यामुळे आपल्याला होते. यांच्यावर आपले जीवन अवलंबून आहे. ही चांगली कार्यक्षम ठेवली पाहिजेत: ह्या इंद्रियांमुळे ज्ञानाबरोबर सुखही होते. सुंदर देखावे, सुवासिक फुले, सुस्वर गायन, चवदार खाद्यपेये, स्पर्शाला मृदू अशा वस्तू, हे इंद्रियांचे विषय होत.

योग्य प्रमाणात ह्या गोष्टी आपल्या हिताच्याच ठरतात. सुख हे जीवनात हवेच आहे. परंतु हे केवळ बाह्य सुख होय. हे फार काळ टिकत नाही. म्हणून ही इंद्रिये आपल्याला स्वस्थ बसू देत नाहीत. मनाला ती बेचैन करून टाकतात. ओढाळ गुरासारखी ती बेफाम होतात. आपला सारासार विचार सुटतो. आपल्या हातून स्वार्थी कृत्ये, दुराचार घडतो.
आपली अधोगती होते. सुखामागे लागून अखेरी दुःखच पदरी पडते. 'भोगाः दुःखयोनय् एव ते' । (५.२२)

वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता । (२.६१)

इंद्रियांना दडपून टाकण्याने ढोंग-मिथ्याचार माजतो. मन विषयांचा विचार करीत बसते. म्हणून इंद्रिये ताब्यात ठेवावी. इंद्रियांना असे आवरले की ती स्वस्थ बनतात. मन शांत व समाधानी राहते. परोपकार, सद्वर्तन, लोकसेवा व त्याग यांची आवड लागते व हे गुण आपल्यात येतात. ईश्वराकडे मन लागते. ज्ञानोपासना होते. असे खंबीर मन हेच शहाणपण—हीच स्थिर प्रज्ञा.

३. आत्मोद्धार

-१२-

उद्धरेद् आत्मना आत्मानम् ।

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ (६.५)

(आपणच आपला उद्धार करावा. आपला नाश करून घेऊ नये.
आपणच आपले बंधू व आपणच आपले शत्रू असतो.)

देवा, मला प्रपंचातून सोडव-माझा उद्धार कर, मला मोक्ष दे अशी भक्त प्रार्थना करतात व देवही 'मी तुझा उद्धार करीन-तुला मोक्ष देईन,' असे वचन देतो. पण हा भक्तीचा-प्रेमाचा – भाग आहे.

खरे म्हणजे देव आपल्याला केवळ बुद्धी म्हणजे प्रेरणा देतो. ददामि बुद्धियोगंतम् । असे श्रीकृष्ण सांगतात (अ.१०.१०). तिचा उपयोग करून आपणच आपला उद्धार करून घेतला पाहिजे.

आपल्याला मदत करणारे किंवा आपला नाश करणारे आपले मित्र किंवा शत्रू आपणच असतो. दुसऱ्यावर-गुरूवर किंवा देवावरही-भार टाकू नये किंवा दुसऱ्याला दोषही देऊ नये. आत्मनिरीक्षण करावे व आपले कोठे चुकते ते पाहावे. 'नाचता येईना अंगण वाकडे' म्हणू नये. A bad workman quarrels with his tools.

आपण आपल्या मनावर ताबा मिळविणे हाच आत्मोद्धाराचा मार्ग. त्यामुळेच आपले कल्याण होईल. तो ताबा जाऊन वाटेल तसे वागण्यात नाश आहे. तो आपण करून घेऊ नये. दैवाला दोष देऊ नये. दैवावर विसंबू नये. स्वतः श्रम केल्यावाचून देव साहाय्य करीत नाही. न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः । God helps those who help themselves.

-१३-

मन हे ओढाळ गुरूं

इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः । (२.६०)

(अतिशय खळबळ माजविणारी इंद्रिये माणसाचे मन जोराने ओढून नेतात.)

डोळे, नाक, कान, जीभ व त्वचा ही आपली पाच ज्ञानेंद्रिये. बाह्य जगाचे ज्ञान यामुळे आपल्याला होते. यांच्यावर आपले जीवन अवलंबून आहे. ही चांगली कार्यक्षम ठेवली पाहिजेत: ह्या इंद्रियांमुळे ज्ञानाबरोबर सुखही होते. सुंदर देखावे, सुवासिक फुले, सुस्वर गायन, चवदार खाद्यपेये, स्पर्शाला मृदू अशा वस्तू, हे इंद्रियांचे विषय होत.

योग्य प्रमाणात ह्या गोष्टी आपल्या हिताच्याच ठरतात. सुख हे जीवनात हवेच आहे. परंतु हे केवळ बाह्य सुख होय. हे फार काळ टिकत नाही. म्हणून ही इंद्रिये आपल्याला स्वस्थ बसू देत नाहीत. मनाला ती बेचैन करून टाकतात. ओढाळ गुरासारखी ती बेफाम होतात. आपला सारासार विचार सुटतो. आपल्या हातून स्वार्थी कृत्ये, दुराचार घडतो.
आपली अधोगती होते. सुखामागे लागून अखेरी दुःखच्च पदरी पडते. 'भोगाः दुःखयोनय् एव ते' । (५.२२)

वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता । (२.६१)

इंद्रियांना दडपून टाकण्याने ढोंग-मिथ्याचार माजतो. मन विषयांचा विचार करीत बसते. म्हणून इंद्रिये ताब्यात ठेवावी. इंद्रियांना असे आवरले की ती स्वस्थ बनतात. मन शांत व समाधानी राहते. परोपकार, सद्वर्तन, लोकसेवा व त्याग यांची आवड लागते व हे गुण आपल्यात येतात. ईश्वराकडे मन लागते. ज्ञानोपासना होते. असे खंबीर मन हेच शहाणपण—हीच स्थिर प्रज्ञा.

मिथ्याचारः स उच्यते ।

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थविमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ (३·६)

(कामे करणाऱ्या हातपाय, इत्यादि इंद्रियांना आवरून परंतु ती इंद्रिये ज्या गोष्टीकडे धाव घेतात त्यांच्या मोहामुळे जो त्या गोष्टी मनात आठवीत बसतो, त्याला ढोंगी म्हणतात.)

नुसता शरीरावर तावा असून चालत नाही. मनावर ताबा ठेवणे हा खरा संयम. सिनेमाला जायचे नाही म्हणून नुसते पाय आवरले व मनात सिनेमाचे विचार चालूच ठेवले तर ते ढोंगीपणाचे होईल. मोह पाडणाऱ्या गोष्टी केवळ शरीराकडून घडल्या नाहीत तरी मनात त्या आल्या तरी त्या मनाने केल्या असेच होते. प्रत्यक्ष चोरी करण्याइतकेच दुसऱ्याच्या पैशांचा मोह मनात आणणे हेही पाप असते.

त्याचप्रमाणे कर्तव्य म्हणून:लढाईसारखे काम प्रत्यक्ष हातून घडले तरी ते पाप ठरत नाही, कारण हिंसा व तीमुळे साधणारा स्वार्थ ही मनात नसतात. मन हिंसेत. आसक्त-गुंतलेले-नसते हाच निष्काम कर्मयोग. याउलट हिंसा न करता मनात दुसऱ्याचे वाईट चिंतणे ही हिंसाच होय.

हा शत्रू ठार कर.

जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् । (३·४३)
(हे पराक्रमी अर्जुना, जिंकण्यास कठिण अशा ह्या कामरूपी शत्रूला ठार कर.)

गीतेत जो श्रीकृष्णाने उपदेश केला आहे तो अर्जुनाने कौरवांशी युद्ध करावे यासाठी केवळ नाही. अर्जुनाने म्हणजे प्रत्येक माणसाने आपल्या मनावर जय मिळवावा, मनाची चैनीकडे, बाह्य सुखांकडे जी ओढ, तिला आळा घालावा यासाठी. बाह्य सुखांकडे ओढ म्हणजेच काम. आपल्या उन्नतीच्या आड येणाऱ्या ह्या शत्रूला ठार केले पाहिजे— म्हणजे जिंकले पाहिजे.

माणसाचे सहा शत्रू-षड्रिपू मानले आहेत ते असे – काम, क्रोध, लोभ, मोह, मद (गर्व) व मत्सर. ह्यांतील काम हा मुख्य होय, कारण त्यामुळेच बाकीचे उत्पन्न होतात. आपल्या सुखाआड येणारा तो शत्रू वाटतो व त्याचा राग येतो. स्वार्थ नाही त्याला शत्रू नसतो. ह्या क्रोधापायी माणूस दुसऱ्याला दुःख देतो, युद्धे व भांडणे होतात. काम व क्रोध ह्यांनी जग दुःखमय केले आहे. हे जगाचे शत्रू होत. काम, क्रोध व लोभ ह्यांना नरकाचे त्रिविध दार म्हटले आहे. (१६·२१). काम हा जिंकण्यास कठिण. कारण तो आपल्या मनातला—घरचा शत्रू आहे. त्याला दडपून चालणार नाही. निग्रहः किं करिष्यति ? त्याला मर्यादेतच ठेवले पाहिजे. हाच संयम.

आपण म्हणजे शरीर नव्हे, मन नव्हे, बुद्धी नव्हे तर त्यापलीकडचा आत्मा म्हणजे परमात्मा आहो. हे ओळखले म्हणजे आत्मज्ञान झाले. मग बाह्य सुखाकडे मन व इंद्रिये धावणार नाहीत. खरे सुखव शांती लाभेल. निःस्वार्थी माणूसच जगासाठी झटेल, ईश्वरभक्त होईल—कृतार्थ होईल.

-१६-

खरा जागा कोण ?

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी । (२·६९)

(सर्व प्राण्यांची जी रात्र, तीत संयमी माणूस जागा रहातो.)

ज्याचा आपल्या मनावर ताबा असतो त्याचे लक्ष बाह्य सुखाकडे, चैनीच्या वस्तूंकडे नसते. इतर माणसे स्वार्थाच्या बाबतीत जागृत असतात. स्वतःचा फायदा, स्वतःचे सुख ह्यांकडे ते डोळ्यांत तेल घालून पाहात असतात. पण संयमी माणूस तिकडे लक्ष देत नाही. तो त्या दृष्टीने झोपलेला असतो. सामान्य माणसांचा जो दिवस ती संयमी माणसाची रात्रच जणू !

पण संयमी माणूस आपल्या मनातील खऱ्या आनंदात मग्न असतो. तो अंतर्मुख असतो. आपला धर्म, आपले कर्तव्य, लोकसेवा, परोपकार, ह्या उदात्त बाबतींत तो जागा असतो. त्यात तो कसूर करीत नाही. सदैव आत्मज्ञान, आत्मविकास, ह्या आंतरिक बाबतींत तो गढून गेलेला असतो. सामान्यांना ह्या गोष्टींची जाणीव नसते-पर्वा नसते. ते बहिर्मुख असतात. तेव्हा त्यांची जी रात्र-अज्ञानरूप झोपेची वेळ—त्यावेळी संयमी माणूस जागा राहतो.

ज्ञानी, संशोधक, कलावंत ह्यांचेही असेच असते. आपल्या विषयात ते दंग असतात. त्यांचे सुख सामान्यांना समजत नाही. त्यांना ते नादिष्ट, जगावेगळे, अरसिक, उदासीन व एकलकोंडे असे समजतात. हीच गोष्ट आत्मसंयमी योग्याची.

*

योगो भवति दुःखहा ।

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ (६·१७)

(ज्याचा आहार व करमणूक ही योग्य-नियमित-आहेत, ज्याचे वागणे योग्य आहे, ज्याचे झोपणे व जागणे प्रमाणात आहे, त्याला हा योग दुःखनाशक म्हणजे सुखकारक होतो.)

योग म्हणजे मन आवरून ते परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर करणे होय. ही साधना कठिण आहे, पण प्रयत्नाने शक्य होते. योगसाधन केलेला योगी हा सुखी, समाधानी, शान्त होतो.

हा योगी जगात योग्य तेच आचरण करतो–स्वार्थ सोडून व परमेश्वरास सतत स्मरून. हा खरा कर्मयोगी होय. उग्र योगसाधन व अचाट सिद्धी प्राप्त करण्याच्या मागे लागलेले ते हठयोगी होत. सामान्य माणसांसाठी कर्मयोगी हाच आदर्श होय.

प्रत्येकजण योगी कसा होणार ! पण आपल्याला झेपतील अशा गोष्टी योग्यापासून शिकाव्या. आपला आहार सात्त्विक, साधा व बेताचा ठेवावा. सुखोपभोग माफक घ्यावे, चांगल्या गोष्टी कराव्या, फार झोपू नये की फार जागूही नये. असे शिस्तबद्ध जीवन सुखी होते. योग म्हणजे शिस्तच.

*

४. समबुद्धी

–१८–

सुखदुःखे समे कृत्वा....

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ (२·३८)

(सुख व दुःख, लाभ व हानी, जय व पराजय, ही सारखी समजून मग तू युद्धाला लाग. अशा रीतीने तुला पाप लागणार नाही.)

युद्धामध्ये बांधवांना मारल्यामुळे आपल्याला पाप लागेल अशी अर्जुनाला भीती वाटत होती. लढणे हे त्याचे कर्तव्य होते. स्वतःच्या सुखासाठी, लाभासाठी किंवा जय मिळवून राज्यसुखाचा लाभही त्याला नको होता, तसे असते तर हिंसेचे व लोभीपणाचे पाप त्याला लागले असते.

माणसाने कर्तव्य करायचे ते कठोर मनाने पुष्कळदा करावे लागते. त्या वेळी स्वताच्या दुःखाचा किंवा तोट्याचा विचार करायचा नसतो. जयाच्या-कीर्तीच्या–हावेनेही कर्तव्य करायचे नसते.

स्वतःच्या फायद्यासाठी शिवाजी महाराजांनी इंग्रजांना सुरतेत लुटले असते तर ते लुटारू ठरते. राष्ट्राला लुटणारांना त्यानी लुटले.

लढाईत सारे काही न्याय्य असते म्हणतात. Everything is fair in war.

लढाई काही अर्जुनाने ओढवून आणली नव्हती. तिला तो जबाबदार नव्हता. तो फक्त आपले कर्तव्य करीत होता. लढाईतील आपला वाटा तो शिस्त म्हणून तो उचलत होता. पाप लागले ते दुर्योधनाला !

समत्वं योग उच्यते ।

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योःसमो भूत्वा; समत्वं योग उच्यते ॥ (२·४८)

(हे अर्जुना, यश व अपयश ही सारखी मानून व फळाची आशा सोडून, योगात स्थिर राहून कर्मे कर. समबुद्धीला योग म्हणतात.)

योगी कोणाला म्हणतात ? योग साधणे म्हणजे काय ? योग म्हणजे एक होणे. सर्व चांगल्यावाईट गोष्टींचा परिणाम मनावर होऊ न देणे-त्या एक-सारख्या मानणे.

योगी माणूस सुखाने वा यशाने हुरळून जात नाही. दुःखाने वा अपयशाने नाउमेद होत नाही. त्याचे मन खंबीर असते.

अशा खंबीर मनाने माणसाच्या हातून महत्कार्ये घडतात. जगातील थोर माणसांनी संकटांत डगमगून न जाता ध्येयावर दृष्टी ठेवून जीवनात यश मिळविले आहे-कर्तृत्व गाजविले आहे.

कामाचे फळ मला काय मिळणार, याकडे दृष्टी ठेवून स्वार्थी वृत्तीने वागल्यास कार्यात कुचराई होते. निःस्वार्थी माणूस धडाडीने काम करतो. त्याला कशाची भीती नसते. व्यवहारातील योग तो हाच.

*

स शान्तिम् अधिगच्छति ।

निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति । (२·७१)

(माझे व मी ही भावना ज्याची निघून गेली तो निर्मम व निरहंकार. तो शान्ती मिळवितो.)

दुःखी होणारा तो मी आहे, अपमान झाला, हानी झाली ती माझी असे वाटल्यामुळे मन अस्वस्थ होते. पण मी म्हणजे आत्मा—तोच देव आहे, मी निराळा नाही हे समजले की आपल्या मनात आपण संतुष्ट होतो. ' आत्मना आत्मानं पश्यन् आत्मनि तुष्यति ।' (६·२०)

हे आत्यंतिक सुख होय. ही ब्राह्मी स्थिती—ब्रह्मनिर्वाण, ब्रह्मरूप होणे. हे प्राप्त होण्यास सर्व आशा सोडाव्या लागतात. निःस्पृह होऊन वागावे लागते. ' विहाय कामान् यः सर्वान् पुमान् चरति निःस्पृहः ।' (२·७१)

ह्या परम सुखाचा लाभ झाल्यावर त्या योग्याला दुसरा कोणताही लाभ अधिक वाटत नाही. ' यं लब्ध्वा च अपरं लाभं मन्यते न अधिकं ततः ।' ह्या सुखात स्थिर झाला म्हणजे मोठ्या दुःखानेही तो विचलित होत नाही—त्याची शान्ती ढळत नाही. ' यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणा अपि विचाल्यते ।' (६·२२).

चिरकालिक शांतीचा हाच मार्ग होय.

★

समदृष्टी

योगी समलोष्टाश्मकांचनः । (६·८)

(योग्याला मातीचे ढेकूळ, दगड व सोने ही सारखीच असतात.)

योग्याला स्वार्थ नसल्यामुळे त्याला सर्व गोष्टी सारख्याच. मातीचे ढेकूळ तो हीन दर्जाचे समजत नाही, दगड कठिण म्हणून त्याला तो टाळीत नाही की सोने मौल्यवान म्हणून त्याचा लोभ करीत नाही. वस्तुतः ह्या गोष्टी भिन्न, परंतु त्यांचा परिणाम त्याच्यावर होत नाही, त्याच्याआड त्या येत नाहीत.

तसे म्हटले तर सर्व जगातल्या वस्तू निसर्गाच्या दृष्टीने सारख्याच महत्त्वाच्या असतात. प्रत्येक पदार्थाचे गुण स्वतंत्र असतात व त्याचे काही उपयोग असतात. मातीतून धान्य पिकते त्यावर आपण जगतो. दगड बांध घालतात व त्यांच्या गुहांमध्ये प्राण्यांना संरक्षण मिळते. सोन्याचे अलंकार होतात, सौंदर्य वाढते. पण दगडमाती ही नसली तर नुसते सोने काय कामाचे ? 'हात लावला की सोने' हा वर मिळालेल्या लोभी राजाला भुकेने व्याकूळ होऊन पश्चात्तापाने मरण्याची पाळी आलीच ना ?

जगात प्रत्येक पदार्थाला महत्त्वाचे स्थान आहे. आपले अज्ञान म्हणून आपण त्यांच्यात फरक करतो. ज्ञानी माणूस हा भेद मानीत नाही.

★

स्थितप्रज्ञ कोण ?

आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते । (२·५५)

(जो स्वतःच आपल्यामध्ये संतुष्ट असतो त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात.)

आपण सर्वसामान्य माणसे आपले सुख बाहेरून मिळवितो. बाहेरील जग किंवा परिस्थिती प्रतिकूल असली तर आपण दुःखी होतो. अशा रीतीने आपण बाह्य जगावर अवलंबून असतो.

परंतु ज्याने आपल्या मनांतील सर्व इच्छा सोडून जो निरिच्छ झाला, त्याला बाहेरच्या कसल्याच गोष्टींची किंवा दुसऱ्या कोणाची जरूर नसते. त्याची बुद्धी बाहेर धावत नाही. ती स्थिर झालेली असते—चंचल नसते. हाच स्थितप्रज्ञ.

स्थितप्रज्ञ माणूस नेहमी प्रसन्न असतो. तो आपले सुख आपणच निर्माण करतो. आपण स्वतः-आपला आत्मा-आपले विचार, आपल्या भावना, आपली भक्ती यांवर तो संतुष्ट असतो. त्याला कोणी दुःखी करू शकत नाही. आत्मसुखात तो दंग असतो.

आपण नेहमी दुसऱ्यावर संतापतो, तक्रारी करतो, त्यांना शत्रू मानतो. आपल्या मनातच आपले सुख आहे हे आपण विसरतो; भलतीकडे ते पहातो. ‘ तुझे आहे तुजपाशी परि तू जागा चुकलासी ! ’

□ □

स्वतःवरून जग ओळखा

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ (६.३२)

(आपल्यासारखेच सर्व आहेत अशा बुद्धीने सर्वांचे सुख किंवा दुःख आपल्यासारखेच आहे हे ज्याला दिसते तो माझ्या मताने श्रेष्ठ योगी आहे.)

परमेश्वर आपल्यात आहे तसाच इतरांतही आहे. म्हणून आपण व इतर एकच आहो, हे ' आत्मौपम्य. ' आपल्याला जसे दुःख होते तसेच इतरांना होते हे जाणून इतरांचे दुःख ते आपले दुःख, इतरांचे सुख तेच आपले सुख समजले पाहिजे. त्याशिवाय लोकहिताची कामे होत नसतात.

[illegible] आपपर भाव न मानता परोपकारार्थ
हाच सर्व योग्यांत श्रेष्ठ होय.
खरा योगी नव्हे.
माणसाने आपण इतरांहून श्रेष्ठ
त्ती, कुत्रा देखील आपल्यासारखे
' शुनि चैव श्वपाके च पंडिताः

-२४-

सर्वत्र समबुद्धयः । सर्वभूतहिते रताः ।

संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ (१२.४)

(सर्व इंद्रियांना ताब्यात ठेवून जे सर्वत्र परमेश्वर आहे व त्याची भक्ती केली पाहिजे म्हणून-सर्वांना सारखे मानतात, सर्व प्राण्यांचे हित करण्यात रमून जातात ते-भक्त-मला प्राप्त करतात.)

आपण इतरांना परके मानून त्यांच्याशी भांडतो, लढतो व आपला स्वार्थ साधतो. आपल्या इंद्रियांच्या योगाने आपल्याला सुख होते. त्यामुळे इंद्रिये आपल्याकडून दुसऱ्यांना त्रास होईल असे वर्तन घडवून आणतात.

इंद्रियांच्या—सुखाच्या—आहारी न जाता त्यांना आवरले म्हणजे सर्वां-विषयी आपलेपणा वाटतो. मग सर्वांचे हित त्यातच आपले हित हा विचार दृढ होतो व समाजाच्या हितासाठी झटण्यात मनुष्याला आनंद वाटतो. अशी लोकसेवा ही ईशसेवा—जनताजनार्दनाची सेवा. ‘ जनी जनार्दन ’ हीच श्रेष्ठ भक्ती.

परमेश्वरही ‘ सर्वभूतहिते रत ’ असाच असतो. म्हणून लोकसेवक भक्त हा परमेश्वररूपच होतो.

संतुष्टो येन केनचित् ।

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान् मे प्रियो नरः ॥ (१२.१९)

(निंदा व स्तुती सारखीच मानणारा, मितभाषी-विचारी, असेल त्यात संतोष मानणारा, घरादारात गुंतून न राहणारा, स्थिर बुद्धीचा व भक्तियुक्त असा मनुष्य मला आवडतो.)

अनिकेत म्हणजे ज्याला घर नाही—जो स्वतःचा संसार सोडून जगाच्या संसारात रमून जातो असा. 'हे विश्वचि माझे घर' अशी त्याची वृत्ती असते असे ज्ञानेश्वर स्पष्ट करतात. तो 'चिंता करतो विश्वाची ।' विश्व हेच त्याचे कुटुंब. विश्वबंधूच तो.

अशा निरिच्छ माणसाची राहणी साधी असते. तो नेहमी प्रसन्न असतो. संतोष हेच त्याचे धन. कशाची हाव तो धरीत नाही. स्वार्थ सुटल्यामुळे त्याचे मन खंबीर असते.

'मी' पणा सोडल्यामुळे कोणी निंदा कोणी वंदा, त्याला त्याचे सुख-दुःख नसते. कोणाशी विशेष बोलण्याचे त्याला कारण नसते. मनात तो विचार-चिंतन करीत असतो. देवाच्या भक्तीने त्याचे मन भरून गेलेले असते व त्यातच तो मग्न असतो.

□ □

तोचि आवडे देवाला

यस्मान्नोद्विजते लोकः लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ (१२·१५)

(ज्याला लोक कंटाळत नाहीत आणि जो लोकांना कंटाळत नाही, जो हर्ष, राग, भय व खेद यांच्या बंधनांपासून मोकळा असतो, तो मला आवडणारा आहे.)

ईश्वराची सेवा म्हणजे लोकाची सेवा. लोकांपासून दूर राहून ज्ञानोपासना, जपतपादि करणारा मनुष्य हा देवाला प्रसन्न करू शकत नाही. खरा भक्त समाजप्रिय असतो व समाजाला तो प्रिय असतो.

ही जनसेवा करताना तो सुखदुःख, राग, भीती ह्या स्वार्थीपणाच्या भावनांना मनात थारा देत नाही. निःस्वार्थी बुद्धीने व लोकांबद्दल प्रेमभाव बाळगून तो झटत असतो. लोकांना टाळून, त्यांच्यापेक्षा आपण वेगळे आहो असे मानून, तो रानात किंवा एकांतात जाऊन बसत नाही.

समाजाला प्रिय तो देवाला प्रिय.

□ □

अद्वेष्टा सर्वभूतानां....

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥
संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ॥ (१२·१३-१४)

(कोणत्याही प्राण्याचा द्वेष–तिटकारा न करणारा, सर्वांशी मैत्री करणारा दयाळू असाच, 'माझेपणा' व 'मी' ही स्वार्थी भावना न बाळगणारा, सुखदु:खे सारखी मानणारा, क्षमाशील,—नेहमी समाधानी, योगी आत्मसंयमी, दृढनिश्चयी, माझ्या ठिकाणी आपले मन व बुद्धी लावणारा, असा जो माझा (खरा) भक्त, तो मला आवडतो.)

सर्वभूतहिते रताः ।

लभन्ते ब्रह्मनिर्वाणम् ऋषयः क्षीणकल्मषाः ।
छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ (५·२५)

(ज्या ऋषींची पापे नष्ट झाली, ज्यांचा इतरांविषयीचा व परमेश्वराविषयीचा दुजाभाव तुटला, ज्यांनी स्वतःवर ताबा मिळवला व जे सर्व प्राणिमात्राचे हित करण्यात आनंदाने मग्न झाले त्या ऋषींना ब्रह्मानंद म्हणजे मोक्ष लाभतो.)

आत्मसंयम, पापनाश, अद्वैतभाव व परोपकार ह्या मोक्षाच्या पायऱ्या होत.



गुणातीतः स उच्यते

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकांचनः ।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥
मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।
सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ (१४·२४-२५)

(सुख व दुःख; मातीचे ढेकूळ, दगड व सोने; आवडत्या व नावडत्या गोष्टी; निंदा व आपली स्तुती; मान-अपमान, मित्र व शत्रू हे दोन पक्ष; ह्या सर्व परस्पर विरुद्ध अशा गोष्टी सारख्या मानणारा व त्यांनी विचलित न होता आपल्या मनात जो स्थिर असतो व स्वार्थाची कामे सोडतो अशा धीराच्या मनुष्याला गुणातीत म्हणतात.)

जगात चांगल्यावाईट गोष्टींचे मिश्रण झालेले असते. उत्तम, मध्यम, नीच हे तीन गुण एकमेकात मिसळलेले किंवा वेगळे आढळतात. ह्यांचा परिणाम आपल्या मनावर होतो व सुख, दुःख, राग, लोभ, द्वेष, आनंद इत्यादी भावनांची खळबळ मनात माजते. स्वताची स्तुती आवडते व निंदेचा संताप येतो.

खरे सुख शांततेत आहे. त्यासाठी ह्या त्रिविध गुणांपलीकडे गेले पाहिजे व मन स्थिर ठेवले पाहिजे. स्थिर मनाशिवाय महान कार्ये घडून येत नाहीत. स्थिरता ही शक्ती, चंचल भावना हे दुबळेपण.

गुणातीत माणूस धीराचा असतो. संकटांना तो धैर्याने तोंड देतो. स्वार्थ सोडून तो जगाच्या कल्याणासाठी सर्वस्व वेचून झटतो.

समः शत्रौ च मित्रे च

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥ (१२·१८)

(शत्रू व मित्र, मान व अपमान, थंडी व ऊन, सुख व दुःख यांना सारखे मानणारा व त्यात गुरफटून न जाणारा–मनाची शांतता ढळू न देणारा असा भक्त देवाला प्रिय असतो.)

शत्रूमध्येही ईश्वरच असतो. शत्रूचे राग द्वेष हे दुर्गुण वाईट. त्यांना काढून टाकण्याचे प्रथम सौम्य-गोडीगुलाबीचे प्रयत्न करावे. अखेर युद्धही करावे. परंतु ते दुर्गुणांविरुद्ध–व्यक्तीविरुद्ध नव्हे. शत्रूही आपला मित्रच. ‘ माझा लढा इंग्रजी साम्राज्याविरुद्ध आहे, इंग्रज माझे मित्रच आहेत,’ असे महात्माजी म्हणत. ‘ Condemn the sin and not the sinner. ’ पापाला दोष द्या; पाप्याला नाही. ह्या भावनेने युद्धात क्रौर्य येत नाही. द्वेषभाव वाढत नाही. शत्रूही शेवटी मित्र होतो.

आपण चांगले असणे हाच आपला खरा मान. दुसरे आपला अपमान करू शकत नाहीत. आपण स्वाभिमान सोडू नये. अपमानाने दुःखी होऊ नये.

एका साधूला एका दुष्टाने खूप शिव्या दिल्या. साधू शांतपणे म्हणाला, ‘ ह्या शिव्या तू दिल्यास खऱ्या पण मी त्या घेत नाही. तेव्हा त्या तुझ्या तुलाच मिळाल्या. ’ संत एकनाथांच्या अंगावर अनेक वेळा थुंकलेला यवन शेवटी खजील झाला व त्यांच्या पाया पडला.

सुखदुःखही मानण्यावर असते. पैसा असूनही कोणी दुःखी असतो तर कोणी दरिद्रीही सुखी असतो. थंडी, ऊन हे सोसावे. अंगी काटकपणा पाहिजे.

५. कर्मयोग

-३१-

नियतं कुरु कर्म त्वम्.... ।

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो हि अकर्मण: । (३·८)

(तुला नेमून दिलेले काम तू कर. कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे ही गोष्ट मोठी आहे–अधिक चांगला आहे.)

अर्जुन हा क्षत्रिय होता. लढणे हे त्याच्या क्षत्रिय धर्मास अनुसरून होते. म्हणून कृष्णाने त्याला लढायला सांगितले. लढण्यास लायक तोच क्षत्रिय, केवळ जातीने तो क्षत्रिय नव्हे.

द्रोणाचार्य ब्राह्मण होते परंतु शूर असल्यामुळे लढणे हे त्यांचे कर्तव्य होते. मनात नव्हते तरी त्यांनी ते कर्तव्य करून रणांगणावर देह ठेवला.

आपले कर्तव्य न केले व स्वस्थ बसले तर जीवनास अर्थ नाही. केवळ जगण्यासाठीही खाणेपिणे सोडून चालत नाही. मग करायचे ते आपल्याला चांगले येते ते करावे. What is worth doing is worth doing well.

शूरांनी जर लढायचे सोडले तर सज्जनांचे रक्षण कोण करील ? जगात अन्याय माजेल. बळी तो कानपिळी ठरेल. म्हणून आक्रमक व स्वार्थी लढाई वाईट, पण सज्जनांच्या संरक्षणासाठी लढणे हा धर्म होय.

—३०—

समः शत्रौ च मित्रे च

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥ (१२·१८)

(शत्रू व मित्र, मान व अपमान, थंडी व ऊन, सुख व दुःख यांना सारखे मानणारा व त्यात गुरफटून न जाणारा—मनाची शांतता ढळू न देणारा असा भक्त देवाला प्रिय असतो.)

शत्रूमध्येही ईश्वरच असतो. शत्रूचे राग द्वेष हे दुर्गुण वाईट. त्यांना काढून टाकण्याचे प्रथम सौम्य-गोडीगुलाबीचे प्रयत्न करावे. अखेर युद्धही करावे. परंतु ते दुर्गुणांविरुद्ध—व्यक्तीविरुद्ध नव्हे. शत्रूही आपला मित्रच. 'माझा लढा इंग्रजी साम्राज्याविरुद्ध आहे, इंग्रज माझे मित्रच आहेत,' असे महात्माजी म्हणत. 'Condemn the sin and not the sinner.' पापाला दोष द्या; पाप्याला नाही. ह्या भावनेने युद्धात क्रौर्य येत नाही. द्वेषभाव वाढत नाही. शत्रूही शेवटी मित्र होतो.

आपण चांगले असणे हाच आपला खरा मान. दुसरे आपला अपमान करू शकत नाहीत. आपण स्वाभिमान सोडू नये. अपमानाने दुःखी होऊ नये.

एका साधूला एका दुष्टाने खूप शिव्या दिल्या. साधू शांतपणे म्हणाला, 'ह्या शिव्या तू दिल्यास खऱ्या पण मी त्या घेत नाही. तेव्हा त्या तुझ्या तुलाच मिळाल्या.' संत एकनाथांच्या अंगावर अनेक वेळा थुंकलेला यवन शेवटी खजील झाला व त्यांच्या पाया पडला.

सुखदुःखही मानण्यावर असते. पैसा असूनही कोणी दुःखी असतो तर कोणी दरिद्रीही सुखी असतो. थंडी, ऊन हे सोसावे. अंगी काटकपणा पाहिजे.

५. कर्मयोग

–३१–

नियतं कुरु कर्म त्वम्.... ।

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो हि अकर्मणः । (३·८)

(तुला नेमून दिलेले काम तू कर. कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे ही गोष्ट मोठी आहे–अधिक चांगली आहे.)

अर्जुन हा क्षत्रिय होता. लढणे हे त्याच्या क्षत्रिय धर्मास अनुसरून होते. म्हणून कृष्णाने त्याला लढायला सांगितले. लढण्यास लायक तोच क्षत्रिय, केवळ जातीने तो क्षत्रिय नव्हे.

द्रोणाचार्य ब्राह्मण होते परंतु शूर असल्यामुळे लढणे हे त्यांचे कर्तव्य होते. मनात नव्हते तरी त्यांनी ते कर्तव्य करून रणांगणावर देह ठेवला.

आपले कर्तव्य न केले व स्वस्थ बसले तर जीवनास अर्थ नाही. केवळ जगण्यासाठीही खाणेपिणे सोडून चालत नाही. मग करायचे ते आपल्याला चांगले येते ते करावे. What is worth doing is worth doing well.

शूरांनी जर लढायचे सोडले तर सज्जनांचे रक्षण कोण करील ? जगात अन्याय माजेल. बळी तो कानपिळी ठरेल. म्हणून आक्रमक व स्वार्थी लढाई वाईट, पण सज्जनांच्या संरक्षणासाठी लढणे हा धर्म होय.

निष्काम कर्मयोग

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।

(तुझा अधिकार फक्त काम करण्याच्या बाबतीतच आहे–
फळांबाबत कधीही नाही.)

माणसाने फक्त चांगली कामे आपले कर्तव्य म्हणून ती केली पाहिजेत. त्यांचे फळ मिळावे ही अपेक्षा करणे चुकीचे आहे. आपला तो अधिकार नाही.

आपण काम करतो तेव्हा त्याचे फळ न्याय म्हणून आपल्यालाच मिळाले पाहिजे असे आपल्याला वाटते, परंतु ते चुकीचे आहे. कारण, आपले काम आपला स्वभाव (प्रकृती) करतो. आपले गुण स्वभावामुळे आपल्यात असतात.

तो स्वभाव काही आपण केलेला नाही. ईश्वराच्या इच्छेने निसर्ग आपल्या हातून कामे घडवितो. ईश्वराची ती कामे, आपली नव्हेत, अशी ईश्वरा-र्पणाची बुद्धी ठेवून आपण फळाची पर्वा करू नये.

आपले काम आपल्यावर फारसे अवलंबून नसते. परिस्थिती, काळ, साधने इत्यादि अनेक गोष्टींच्या अनुकूलतेमुळे आपल्याला फळ मिळते म्हणून त्यावर आपला अधिकार नसतो. मी कर्ता हा अहंभाव सोडल्यामुळे अपयशाचा खेद होत नाही हा आपला एक मोठा फायदा आहे.

□ □

-३३-

आळशी बनू नका !

मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्तु अकर्मणि । (२.४७)

(तू कर्मफलाचा हेतू धरणारा होऊ नकोस. त्याचप्रमाणे कामे न करण्यापासूनही तू दूर रहा.)

आपला अधिकार फक्त काम करण्याचा आहे--त्याचे फळ घेण्याचा नाही. फळाचा स्वार्थी हेतू मनात धरू नये. पण फळ जर आपल्याला मिळणार नाही किंवा मिळाले तरी ते नको, असे म्हणून स्वस्थ बसणे हेही योग्य नाही. काम करणे हे कर्तव्यच आहे. त्याचे बरेवाईट फळ हे मिळणारच. पण केवळ फळासाठी काम करणे हे आपलपोटेपणाचे होय. फळ मिळो न मिळो अशी भावना धरली की सद्भावनेनेच काम घडते. दुसऱ्यासाठी झटणे, परोपकार करणे, यासारखी लोकहिताची कामे झालीच पाहिजेत. स्वार्थापुरते काम करीन, असे प्रत्येकाने म्हटले तर समाजाचा गाडा नीट चालणार नाही. राष्ट्राची प्रगती उद्योगामुळे होते. आळशीपणाचे जीवन हे खरे जीवनच नव्हे.



-३४-

दरिद्री कोण ?

कृपणाः फलहेतवः । (२.४९)

(स्वताला फळ मिळावे असा हेतू धरणारे दरिद्री--कीव करण्या-
सारखे असतात.)

स्वतासाठी काही मिळावे म्हणून धडपडणारा मनुष्य दरिद्रीच समजावा. कारण, काही मिळावे असे आपल्याला वाटते, आपल्याजवळ आहे ते कमी वाटते. लोभी माणूस दरिद्री असतो. त्याची कीवच केली पाहिजे. फलासाठी तो शिणतो, अपमान सोसतो, चोऱ्यामाऱ्याही करतो.

याउलट, निःस्वार्थी माणसे समाधानी असतात. तेच खरे श्रीमंत. 'संतोष एव पुरुषस्य परं निधानम् ।' समाधान हा मनुष्याचा मोठा ठेवा आहे. फळाची आशा सोडतो तोच निःस्वार्थीपणे आपले कर्तव्य पार पाडू शकतो.



□ □

यज्ञ, दान व तप

यज्ञ-दान-तपः-कर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ (१८.५)

(यज्ञ, दान व तप हे कर्म सोडू नये ते करावेच. कारण यज्ञ, दान व तप, ही कर्मे विद्वान माणसाला पवित्र करणारी अशीच आहेत.)

विद्वान माणसाला केवळ ज्ञान पुरेसे नाही. त्याचे जीवन पूर्ण होण्यासाठी त्याने यज्ञ, दान, तप, ही केलीच पाहिजेत. नुसते ' हरि हरि ' करीत बसू नये. या कर्मांनी तो पवित्र बनतो. ती सोडून संन्यासी बनणे हा खरा त्याग नव्हे.

खरा त्याग म्हणजे कामे करून जी फळे मिळतात त्यांची आशा सोडणे—निरिच्छपणे कामे करणे हा होय. त्याग हा प्रत्यक्ष कामे करण्याने होतो. दुसऱ्यासाठी कामे करणे हे त्यागाचे खरे स्वरूप. यज्ञ, दान, तप, यांसाठी आपल्या धनाचा, आपल्या सुखाचा, त्याग करावा लागतो. यज्ञाची सांगता दानाने व दानानंतर तप, म्हणजे ईश्वरासाठी देह झिजविणे—कष्ट करणे—ही श्रेष्ठ पायरी होय. आज यज्ञ नाहीत पण जगाचा विविध व्यवहार हा यज्ञच होय. त्यात स्वार्थाची आहुती देतात ते हुतात्मेच होत. ज्ञानी माणसाने हुतात्मा बनले पाहिजे. जीवनाचे फूल जनताजनार्दनाच्या पायांवर अर्पण केले पाहिजे.

-३६-

सात्त्विक त्याग

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।
संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः ।

(हे अर्जुना, ' आपल्याला जे नेमून दिलेले काम आहे ते केलेच पाहिजे अशा निष्ठेने, त्यात गुरफटून न जाता व फळाची आशा सोडून जो करतो तो त्याचा सात्त्विक म्हणजे उत्कृष्ट त्याग समजला जातो.)

समाज नीट चालावा म्हणून प्रत्येक माणसाच्या वाट्याला काही कामे आलेली असतात. ती आपण केलीच पाहिजेत, अशी भावना बाळगून निष्ठेने केली तर समाजाची घडी विसकटत नाही. उत्तम नागरिक हा देशासाठी कामे करीत असतो.

निःस्वार्थी बुद्धीने कार्य करणे हाच श्रेष्ठ त्याग.



-३७-

खरा त्यागी

यस्तु कर्मफलत्यागी स त्यागी इत्यभिधीयते। (१८.११)

(जो आपल्या कामाच्या फळाचा त्याग करतो त्यालाच त्यागी असे म्हटले जाते.)

आपली कामे सोडून देणे व नुसते 'हरि हरि' करीत बसणे म्हणजे संसाराचा त्याग नव्हे. तो केवळ बेजबाबदारपणा होय. आपले कर्तव्य टाळू नये. ते निःस्वार्थबुद्धीने करावे-दुसऱ्यासाठी करावे.

त्याचे फळ आपल्याला मिळावे ही आशा सोडली की तोच खरा त्याग-तोच खरा संन्यास. तसे पाहिले तर जगण्यासाठी काहीतरी खटपट-खाणे, पिणे, श्वासोच्छ्वास हे तरी करावेच लागते. काम टळत नाही.

कर्मसंन्यास म्हणजे कर्मफलाचा संन्यास-कर्माचा नव्हे.





-३८-

कष्ट करा !

न द्वेष्टि अकुशलं कर्म कुशले नानुषज्यते । (१८·१०)

(सात्त्विक त्याग करणारा ज्ञानी मनुष्य त्रासदायक कर्तव्यकर्माचा तिटकारा करीत नाही, की केवळ स्वतःचे हित करणाऱ्या कामात गुंतुन रहात नाही.)

श्रेष्ठ प्रकारचा त्याग म्हणजे स्वार्थ सोडून आपली कर्तव्ये पार पाडणे-मग ती कितीही संकटमय असोत की दुःख देणारी असोत.

सामान्य स्वार्थी माणूस आपल्याला सुख होईल अशाच गोष्टी करीत राहतो पैसा मिळवणे, सुखोपभोग, आपली बायकामुले, आप्त ह्यांचा सहवास, ह्या स्वताला सुख देणाऱ्या गोष्टींसाठी तो धडपडतो. त्यापलीकडे तो जात नाही. त्यांच्यासाठी संकटांत उडी घालणे तर दूरच. चैन, आराम हेच त्याचे ध्येय.

जगाचे कल्याण होते ते निःस्वार्थी, कष्ट व संकटे यांना धीराने तोंड देणाऱ्या माणसांकडून. हेच खरे त्यागी, खरे ज्ञानी, खरे सज्जन. मुलांनी केवळ आवडत्या गोष्टी-खेळ, गाणी, खाणेपिणे, हिंडणे यांपलीकडे कष्टदायक कामे म्हणजे अभ्यास, श्रमदान, इत्यादि केली पाहिजेत.





दैवं चैवात्र पंचमम् ।

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक् चेष्टाः दैवं चैवात्र पंचमम् ॥ (१८·१४)
(जागा; कर्ता, वेगवेगळी साधनसामुग्री, नाना प्रकारचे प्रयत्न
व पाचवे म्हणजे दैव, ही कर्माच्या यशाची कारणे होत.)

आपल्या फळावर आपलाच अधिकार असतो; तेव्हा त्याचा त्याग कशाला करायचा, असा प्रश्न साहजिकच मनात येतो. ह्याच भावनेने मनुष्य स्वार्थ सोडीत नाही. हीच अहंभावना—अहंकार.

ह्या प्रश्नाचे उत्तर सांख्य तत्त्वज्ञान्यांनी दिले आहे. ते म्हणतात, कोणतेही काम केवळ आपण म्हणजे कर्ता करीत नाही. पीक काढायचे तर त्याला केवळ शेतकरी (कर्ता) असून भागत नाही. शेत, बैल, नांगर, बी बियाणे खते इत्यादि अनेक साधने लागतात. ती घेऊन त्याने मेहनत केली पाहिजे. इतकेही करून पीक त्याच्या हाती पडतेच असे नाही. पाऊस हवा. तो दैवाहाती—त्याच्या हाती नाही. तेव्हा पिकावर त्याचा एकट्याचा हक्क कसा ? स्वतः सोडून इतर गोष्टी त्याला दुसऱ्यानी दिलेल्या असतात. म्हणून माणसाने केवळ स्वार्थ पहाणे अन्यायाचे होईल. इतरांसाठी त्याग हाच न्याय आहे. दैव म्हणजे आपल्याला माहीत नसलेली कारणे. पाऊस पडला नाही तर आपले दैव, असे आपण म्हणतो. पण दैवावर मात बाकीच्या चार गोष्टी करू शकतात. दैव केवळ पाचवे—शेवटचे होय.

अनासक्ती

तस्माद् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो हि आचरन् कर्म परम् आप्नोति पूरुषः ॥ (३.१९)

(म्हणून तू नेहमी तुझे कर्तव्य कर्म त्यात चिकटून न राहता निस्वार्थीपणाने-चांगल्या प्रकारे कर. अशा निःस्वार्थीपणाने कामे करणारा मनुष्यच श्रेष्ठ पद प्राप्त करतो.)

माणसाचे समाधान त्याच्या मनातच असते. त्यात जो रमून गेला तो आत्मतृप्त झाला. त्याला स्वतःसाठी काहीच करावयाची जरूर नसते. त्याने कामे केली तरी त्यांत तो गुंतून पडत नसतो.

म्हणूनच अशा श्रेष्ठ माणसाने स्वस्थ न बसता लोकांसाठी सतत कामे केली पाहिजेत. लोकांकडून काही अपेक्षा नसल्यामुळे त्याच्या हातूनच ती चांगल्या प्रकारे होऊ शकतील. असा माणूसच लोकसेवक होण्यास पात्र असतो. त्याच्या कामाची त्याला स्वतःला जरूर नसली तरी समाजाला असते. संतांनी जगाचा संसार केला पाहिजे. 'जन हे बुडती न बघवे डोळां' असे म्हणून सर्व सत्पुरुषांनी जनहितार्थ उपदेश केला आहे.

सर्व प्राण्यांविषयी खरी दया असेल तर निस्वार्थी माणूस त्यांच्यासाठी सतत झटणारच. लोकसेवा ही ईशसेवा असल्यामुळे त्यालाच परमोच्च पदाची-मोक्षाची प्राप्ती होईल. त्यावाचून त्याचे जीवन सफल होणार नाही.

□ □

जगाच्या कल्याणा....

लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि । (३.२०)

(जगाची धारणा व्हावी ही दृष्टी ठेवून देखील तू कर्म करणे योग्य होय.)

परमेश्वराची प्राप्ती होण्यासाठी निःस्वार्थीपणाने कामे करावी, हे खरे. पण जगाच्या कल्याणासाठीही आपली कामे केली पाहिजेत. लोक म्हणजे जग. जगातली माणसे. ‘ संग्रह ’ म्हणजे स्थिरता, एकत्र सुरळीत व्यवहार. ज्याने त्याने आपले कर्तव्य केले पाहिजे. जगाचे आपण ऋणी आहो. स्वताचा मोक्ष-आपली उन्नती-हेच केवळ जीवनाचे सर्वस्व नव्हे.

यासाठी लोकांप्रमाणे आपण वागावे. नाहीतर ज्ञानी माणूस वेगळा वागू लागला तर आपण कसे वागावे हे लोकांना समजणार नाही. त्यांच्या मनाचा गोंधळ होईल. बुद्धिभेद होईल. तो करू नये. ‘ न बुद्धिभेदं जनयेद् अज्ञानाम् । ’ लोकांस सुधारणे हे ज्ञान्याचे कर्तव्यच आहे.

मग ज्ञानी माणसात निराळेपणा कसा राहील ? लोक करतात ते स्वार्थी-पणाने, तर ज्ञान्याने तेच निस्वार्थीपणाने करावे. सुखदुःख, यशापयश मानू नये. लोकांपुढे स्वतःचे असे उदाहरण ठेवावे म्हणजे लोकही सहज अनुकरण करतील. लोकांना सत्कृत्यांची आवड लावावी. (‘ जोषयेत् सर्वकर्माणि ।) अशा रीतीने जगाचा गाडा नीट चालेल. हाच लोकसंग्रह. ‘ सर्वभूतहिते रताः ’ असे खरे थोर संत असतात ते ह्याच अर्थाने. ‘ प्रपंच करावा नेटका ’ असे समर्थ म्हणतात. प्रपंचात राहून परमार्थ साधावा.

चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ।

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।
कुर्याद् विद्वान् तथासक्तः चिकीर्षुः लोकसंग्रहम् ॥ (३.२५)

(हे भरतकुलातील अर्जुना, कर्मात आसक्त झालेले अज्ञानी लोक जशी व जी कामे करतात तशी ती जगाची धारणा करू इच्छिणाऱ्या ज्ञानी माणसानेही, पण आसक्ती सोडून– निरिच्छपणे करावी.)

लोकसंग्रह म्हणजे जगाचे-समाजाचे स्थैर्य. समाज विस्कळित होईल असे ज्ञानी माणसाने वागू नये. सामान्य माणसांत मिसळून त्यांच्यासारखीच म्हणजे ते करतात तीच कामे त्याने करावी. संसार सोडू नये.

ज्ञानी माणसाने संसारातील-समाजातील कर्तव्ये सोडली तर त्याचे अनुकरण सामान्य लोक करतील व समाजाची घडी विस्कटेल. '**यद् यद् आचरति श्रेष्ठः तत् तत् एवेतरो जनः ।**' श्रेष्ठ आचरतील तसे इतर लोकही आचरण करतात.

मग ज्ञानी माणसात वेगळेपणा कोठला ? इतर लोक स्वार्थाने कामे करतात तर ज्ञानी माणूस आसक्ती सोडून निःस्वार्थीपणाने ती करतो व आपले उदाहरण घालून देऊन लोकांना सुधारणेच्या मार्गाला लावतो. लोकमान्य टिळकांनी असाच लोकसंग्रह केला, स्वातंत्र्याची चळवळ केली, ग्रंथ लिहिले, खटले लढवले–पण स्वार्थ सोडून.

□ □

न बुद्धिभेदं जनयेद् अज्ञानाम् ।

न बुद्धिभेदं जनयेद् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।
जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन् ॥ (३.२६)

(कर्मात आसक्ती ठेवणाऱ्या-मन गुंतलेल्या—अज्ञानी माणसांच्या बुद्धीला—निष्ठेला फाटे फोडू नये. ज्ञानी माणसाने योग्य म्हणजे आसक्ती सोडून चांगले आचरण करून तशी सर्व कामे करण्याची आवड त्या अज्ञानी लोकांना लावावी.)

आपल्याला कशाची इच्छा नाही, असे म्हणून ज्ञानी माणसे कर्तव्य-कर्मे करण्याचे सोडून 'हरि हरि' करीत स्वस्थ बसली तर अज्ञानी माणसेही कर्तव्ये सोडून देतात, आळशी बनतात. त्यांची बुद्धी-म्हणजे निष्ठा दुभंगते, ढासळते. मनाचा गोंधळ होतो. कर्तव्यांवरील त्यांचा विश्वास उडतो.

मग जगरहाटी चालत नाही. म्हणून ज्ञानी माणसाने लोकसंग्रहासाठी, जगाचा व्यवहार दृढ रहावा म्हणून त्यांची कर्तव्यनिष्ठा मोडू नये! त्यांच्या बुद्धीचा भेद करू नये. संसारात राहून निरिच्छपणे कर्तव्ये पार पाडण्यात, इतरांसाठी काम करण्यात आनंद मानण्याची त्यांना गोडी लावावी. अर्थात् स्वतःच्या उदाहरणाने ज्ञानी माणसाने लोकांना असे कर्मयोगी करावे.

□ □

योग म्हणजे काय ?

योगः कर्मसु कौशलम् । (२.५०)

(योग म्हणजे निःस्वार्थबुद्धीने काम करण्यात कुशलता.)

फळाची आशा सोडून, सुखदुःखाच्या पलीकडे जाऊन आपले कर्तव्य करणे ही सामान्य गोष्ट नाही. 'आपले मन ताब्यात ठेवून मोह आवरावा लागतो. आपल्या सुखासाठी काबाडकष्ट करणे त्या मानाने सोपे आहे. पण केवळ कर्तव्य म्हणून कष्ट सोसणे, स्वतःचे दुःख बाजूला सारणे, यासाठी मनाची मोठी तयारी करावी लागते. खरा शहाणपणा–कौशल्य ते हेच होय. हाच योग–कर्मयोग.

' समत्वं योग उच्यते ।' समबुद्धी हा योग म्हणतात. हा बुद्धियोग-ज्ञान-योग. पण केवळ ज्ञानी होऊन जगाचा फायदा होत नाही. ज्ञानी माणसाने लोकहितासाठी आपली कर्तव्ये केली पाहिजेत. ज्ञान हा कर्मांचा केवळ पाया आहे. त्यावर कर्मांची इमारत उभी रहावी. ज्ञानयुक्त कर्म हाच कर्मयोग. कर्माला ज्ञानाची जोड पाहिजे व ज्ञानाची पूर्णता कर्मांत झाली पाहिजे.

समबुद्धी-निःस्वार्थबुद्धी हा योग व हेच कर्म करण्यातील कौशल्य होय. स्वार्थ सोडणे ही यशस्वी जीवनाची युक्ती होय.

□ □

दोष सर्वत्रच असणार !

सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता : । (१८'४८)

(जसा अग्नि धुराने झाकलेला असतो त्याप्रमाणे सगळीच कामे दोषांनी झाकेलेली असतात.)

हलकीसलकी कामे करण्यात थोरांना कमीपणा वाटत नाही. ' न **द्वेष्टि अकुशलं कर्म** । ' लाकडे पेटवितांना आधी धूर निघतो व नंतर अग्नी प्रज्वलित होतो. धुराला त्रासून कोणी चूल पेटवू नये म्हटले तर चालणार नाही. कळकट धुरामागून सोन्यासारख्या तेजस्वी अग्नीचे दर्शन घडते.

कामाचेही असेच आहे. काही काम दिसायला गलिच्छ किंवा क्रूरपणाची, हलकी अशी वाटतात. पण कर्तव्यनिष्ठेने ती पार पाडली तर त्यांचा परिणाम उत्तम दिसून येतो. त्यांनी समाजाचे हित होते. समाजहित ही अग्नीसारखी तेजस्वी व पवित्र गोष्ट आहे.

माणसांची कामे ती पंडितांची, योद्ध्यांची असोत, व्यापाऱ्यांची असोत की रस्ते झाडणारांची असोत, समाजाच्या हिताचीच ती सर्व असतात. सर्वच सारखी महत्त्वाची, सर्वांचा अंतिम परिणाम एकच. नाटक सर्व भूमिकांनी रंगते-केवळ राजा, सेनापती यांच्यामुळे नाही. म्हणून माणसांचा दर्जा ज्या निष्ठेने तो काम करतो त्यावरून ठरतो.– कामाच्या प्रकारावरून नव्हे.

हीच खरी समता होय.

□ □

काम हलके मानू नये.

सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत् । (१८·४८)
(हे कुंतीपुत्रा, आपल्या स्वभावास अनुरूप असलेले काम सदोष असले तरी ते टाकू नये.)

सहज म्हणजे जन्मापासून आपले झालेले. हे काम आपल्या मूळ स्वभावास धरून असते. तेच आपल्याला चांगले करता येते. तोच स्वधर्म तो सोडू नये.

पूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण म्हणजे जाती ठरवून दिल्या होत्या. जन्मापासूनच त्या ठरत. ही चातुर्वर्ण्य व्यवस्था. वाडवडिलांचेच धंदे पुढे मुले शिकत व चालवीत म्हणून त्यांचा तो स्वाभाविक धर्म मानला जात असे. क्षत्रियाने ब्राह्मणाचे काम, किंवा शूद्राने क्षत्रियाचे असे चांगले केले तरी वर्णव्यवस्था मोडेल म्हणून त्याने ते करू नये असे बंधन होते. ते तोडून शूद्रांचे, क्षत्रियांचे ब्राह्मण झाले व त्यांना तसे मानलेही, पण हे केवळ अपवाद म्हणूनच. दुसऱ्याचे काम चांगले करण्यापेक्षा स्वतःचे जसे येईल. तसे-वाईटही करावे, असे गीता सांगते.

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।

आता चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे भेद माजले, समाजाची धारणा होत नाही म्हणून हा धर्म बदलला आहे व ते योग्यच आहे. तथापि, माणसांत जन्मतःच भेद असतात. ते नैसर्गिक होत. त्यात जातीचा संबंध नाही. तेव्हा जन्मजात पात्रतेस धरून तेच करणे न्यायाचे-समाजहिताचे. ते हल्के असले तरी करावे. जीवनाचे सार्थकच होईल. कारण जीवन स्वतःसाठी नाही – जगासाठी आहे.

९००

-४७- किशोर ३९८

ज्ञान की कर्म ?

...**कर्मयोगो विशिष्यते ।** (५·२)

(संन्यास किंवा ज्ञानमार्ग त्यांपेक्षा कर्मयोग विशेष चांगला आहे.)

परमेश्वराचे ज्ञान झाले की मोक्ष मिळतो—परमेश्वर स्वरूपात प्राणी मिळून जातो. मोक्ष म्हणजे दुःखांच्या पलीकडील नित्य असा आनंद—ब्रह्मानंद. हा संन्यास म्हणजे ज्ञानमार्ग. आसक्ती सोडून—निष्काम—कर्मे करणे व ती लोकांच्या कल्याणार्थ, हा कर्मयोग. दोन्ही मार्गांनी मोक्ष मिळतो. **संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरौ उभौ ।** मार्ग कोणताही स्वीकारावा आपल्या स्वभावानुसार, पण तो चांगला आचरावा. ज्ञान व कर्म यांत विरोध नाही. संन्यासी—ज्ञानी—हा तरी द्वेष व इच्छा सोडून दिलेला असावा लागतो. तरच तो पक्का, कायमचा, नित्यसंन्यासी जाणावा. **ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ।** कर्मयोग्यालाही असेच निरिच्छ, निर्वैर असावे लागते. संन्यासीही योगी पाहिजे. तेव्हा दोन्ही पाहिजेत. ज्ञान नसता नुसती कर्मे करून फायदा नाही. ज्ञान कर्मामध्ये पूर्ण होते.

सामान्य माणसाला तत्त्वज्ञान समजणे कठिण. त्यापेक्षा निःस्वार्थ कामे करणे सोपे, हाच कर्मयोगाचा विशेष. सामान्य माणसांनीच नव्हे तर ज्ञान्यांनीही भक्तीने, निष्ठेने लोकहिताची कामे केली पाहिजेतच. ज्ञानाला भक्तीची, कर्माची जोड हवीच. समजून, निष्ठेने, व निःस्वार्थीपणे झटणे हेच यशस्वी जीवन होय. ज्ञानी पण स्वार्थी माणूस काय कामाचा ? त्याला देव तरी कसा मिळेल ?

चांगल्यातून चांगलेच !

न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति । (६-४०)

(बाबा अर्जुना, कल्याण म्हणजे चांगले करणाऱ्याला कधीही
वाईट दशा येत नाही.)

योगसाधन करणाऱ्याला जर यश आले नाही, त्याची साधना अपुरी झाली तर त्याचा वाईट परिणाम होतो काय, अशी शंका अर्जुनाला आली. त्यावर अत्यंत प्रेमाने त्या दयाघन देवाने–श्रीकृष्णाने–अर्जुनाला आश्वासन दिले की, चांगल्या कामाचा असा दुष्परिणाम कधीही होणार नाही. आपल्याला सावेल तितके चांगले करीत रहावे. चांगले कधीही वाया जात नाही. चांगल्याचा परिणाम चांगलाच !

योगसाधन हे सामान्य माणसाचे काम नाही, अर्धवट साधले तर भलताच प्रसंग ओढवायचा, ही भीती अनेकांना असते. म्हणून ते आत्मोन्नतीच्या वाटेला जात नाहीत. अशा माणसांनी लक्षात ठेवावे की चांगल्या हेतूने थोडेसे तरी चांगले काम हातून घडले तरी देवाला ते प्रिय असते. 'पत्रं पुष्पं फलं तोयं' भक्तीने काहीही द्या. देव ते प्रेमाने स्वीकारतो. 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।' ह्या जन्मी राहिलेले पुढील जन्मी पूर्ण होईल. म्हणून थोडा का होईना, धर्म आचरावा. तो धर्म आपले रक्षणच करील.

□ □

थोडयाची महती

स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् । (२·४०)

(ह्या धर्माचे अतिशय थोडे असे आचरणही मोठ्या भयापासून रक्षण करते.)

कर्तव्य कर्मे निरिच्छपणे करणे हा कर्मयोग. हा धर्म शिकवितांना प्रथम श्रीकृष्णांनी ह्याचे महत्त्व सांगितले आहे. ते असे की, ह्याचे थोडेसे आचरण जरी माणसाकडून घडले तर त्याला ईश्वरप्राप्ती होते–मोक्ष मिळतो. मग त्याला जन्ममृत्यूचे भय राहत नाही. तो परमेश्वरी तत्त्वात कायमचा राहतो. पुन्हा संसाराच्या जंजाळात सापडण्याची त्याला भीती नाही. अशा रीतीने लहान धर्माचरण महान् संकटातून तारते.

निष्काम कर्म थोडेसे घडले तरी त्यामागे मनाची तयारी मोठी असते. नुसती कर्मयोगाविषयी जिज्ञासा झाली तरी पुरे. नंतर आचरण घडतेच व मग तो मनुष्य सर्व वेदांचा अभ्यास केलेल्या विद्वानाच्या, शब्दब्रह्माच्यापुढे जातो. ‘ जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते । ’ पुस्तकी वेदविद्येपेक्षा धर्माच्या थोड्याशा आचरणाचे महत्त्व अधिक आहे. ‘ लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण ’ अशी कोरडी पोपटविद्या काय कामाची ? ज्ञान कृतीत उतरले पाहिजे. ‘ कृतीचि बरवी असे ’ ‘ बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले । ’

महात्मा गांधींनी सत्य व अहिंसा ह्या गीतेतील धर्मावर भर दिला. हाच श्लोक मनात धरून त्यांनी अत्यंत सुंदर शब्दांत म्हटले आहे की, ‘ गीतेवर लिहिलेले सारे ग्रंथ एका पारड्यात घातले व दुसऱ्यात गीतेतील एकच लहानसा आचरणात उतरविलेला उपदेश टाकला तर ते दुसरे पारडेच जड ठरेल. ’

मत्कर्मपरमो भव ।

मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि ॥ (१२.१०)

(माझ्याकरिता म्हणून तू कामे केलीस तरी तुला पूर्णत्व मिळेल.)

परमेश्वराची साधना करण्यासाठी परमेश्वराच्या ठिकाणी मन लावून भक्त एकाग्रतेने त्याचे चिंतन करतात. हे ईश्वराचे ध्यान. ईश्वराचे नामस्मरण म्हणजे ध्यानाचे साधनच.

सामान्य माणसाला ध्यानधारणा, मनाची एकाग्रता, ह्या गोष्टी कठिण वाटतात. प्रयत्न करूनही त्या जमत नाहीत. यासाठी श्रीकृष्णाने सोपा उपाय सांगितला आहे.

जे जे आपण करतो ते स्वतःसाठी नसून त्याद्वारा देवाला प्रसन्न करावे म्हणून, ह्या भावनेने कामे करावी. यामुळे आपल्या हातून चांगली कामेच घडतील. लोकांचे कल्याण साधेल. ह्यामुळे ईश्वर प्रसन्न होईलच. कारण, देवाचे काम — लोकहित — ते आपण करतो. देवाशी सहकार्य करतो — देवच होतो.

देवासाठी देवळे बांधणे, पूजाअर्चा, इ. गोष्टींनी देव प्रसन्न होणार नाही. देवासारखे ' सर्वभूतहिते रतः ' झाले पाहिजे. परोपकार केला पाहिजे.



□ □

खरी पूजा कोणती ?

स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः । (१८.४६)

(आपले कर्तव्य करण्याने त्या परमेश्वराची पूजा करून मनुष्य पूर्णत्वाला जातो–सिद्धी मिळवतो.)

सिद्धी म्हणजे पूर्णता. सिद्ध पुरुषाला जीवनातील संपूर्ण यश प्राप्त झालेले असते. त्याच्यामध्ये कोणताही कमीपणा – उणीव नसते. हा आदर्श मनुष्य सामान्याहून श्रेष्ठ – Superman – असतो.

परमेश्वराला प्रसन्न करून ही सिद्धावस्था प्राप्त होते. परमेश्वराशी एकरूप होणे – नराचा नारायण होणे – ते हेच. परमेश्वरप्राप्तीसाठी तपश्चर्या करणे, संसारातून उठून रानावनात राहणे, यासारख्या गोष्टी सामान्य माणसासाठी नाहीत. त्यांना त्या शक्य नसतात व आवश्यकही नसतात.

आपल्या वाट्याला आलेले काम – आपल्या स्वभावास योग्य असे काम- निष्ठेने करणे हीच परमेशाची पूजा. लोकसेवा हीच ईशसेवा. आपण आपले जीवन लोककल्याणासाठी वेचणे ह्यासारखे परमेश्वराला प्रिय कोणते ? कारण परमेश्वर हा लोकांच्या कल्याणार्थ झटत असतो. ते काम आपण करणे म्हणजेच परमेश्वराशी तद्रूप होणे. हेच जीवनाचे ध्येय.

-५२-

कर्माचे गूढ

गहना कर्मणो गतिः । (४.१७)

(कर्माचा अर्थ – त्याचे स्वरूप – कळणे अत्यंत कठिण आहे)

लढावे की न लढावे, हा प्रश्न अर्जुनाला पडला होता. इकडे आड त तिकडे विहीर, अशा पेचात तो सापडला होता. शेक्सपिअरच्या हॅम्लेटल 'To be or not to be' – जगावे की मरावे – ह्या विचाराने वेड्यासार झाले होते. जगातील तत्त्वज्ञान्यांचाही ह्या कर्मविचाराने गोंधळ उडाल आहे. '**किं कर्म किम् अकर्म इति कवयोऽपि अत्र मोहिताः** । काय करावे काय न करावे, ह्याविषयी ज्ञानीही गोंधळून गेले आहेत, अ गीताकार म्हणतात (४.१६) मग सामान्यांची काय कथा ?

कर्म म्हणजे कर्तव्य. अकर्म म्हणजे कर्म-त्याग व विकर्म म्हणजे विपरीत- भलते – कर्म , ह्या तिन्हींचा स्पष्ट उलगडा न झाल्याने माणूस गोंधळू जातो. मग त्याने शास्त्रास धरून–नीतीने–वागावे म्हटले तरी त्या सत्कर्मा फळ भोगण्यासाठी त्याला पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडावे लागते त्यातून सुटका होणे म्हणजे मोक्ष. कर्मे सोडावी तर ते अशक्य. खाणेपिणे श्वासोच्छ्वास करणे इत्यादि क्रिया टाळता येत नाहीत. शरीरयात्रेसाठी त्य हव्यातच.

हे कर्म ज्ञानाच्या अग्नीने भस्मसात होते. फलाशा सोडून, स्वार्थ सोडू देवाच्या नावाने लोकहितार्थ कर्मे केली की ती बंधनकारक होत नाही मोक्षाच्या आड येत नाहीत. असा निष्काम कर्मयोग हेच गीतेचे रहस्य हो

६. स्वधर्म

-५३-

प्रकृति यान्ति भूतानि ।

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवान् अपि ।
प्रकृतिं यान्ति भूतानि; निग्रहः किं करिष्यति ॥ (३.३३)

(ज्ञानी माणूस असला तरी तो आपल्या मूळ स्वभावासारखाच वागतो. सर्व प्राणी आपल्या मूळ स्वभावावर जातात. मूळ स्वभाव दडपून काय होणार ?)

मूळ स्वभाव दडपला जात नसतो. अर्जुन शूर होता. लढणे हे त्याच्या मूळ स्वभावातच होते. पराक्रमाला तो दडपू पहात होता. तू नाही म्हटले तरी तुझा मूळ स्वभाव तुला लढायला लावील—प्रकृतिः त्वां नियोक्ष्यति—असे श्रीकृष्णाने अखेरीस त्याला सांगितले.

सामान्यांचे राहो, परंतु ज्ञानी माणूस-योगी-देखील मूळस्वभावावर जातो. ‘ मूळस्वभाव जाइना ’ असे तुकाराम महाराज म्हणतात. सर्व प्राणी आपापल्या स्वभावानुसार वागतात. वाघ काही केले तरी शेळीसारखा गरीब होणार नाही. सर्कशीत त्यावर दडपण आणतात—निग्रह करतात. तेवढ्यापुरताच तो धाकाने वागतो.

मग संस्कारांचा, शिक्षणाचा काय उपयोग ? वाईट माणूस वाईटच राहणार काय ? पण मुळात माणूस वाईट नसतो-परिस्थितीने तो तसा होतो. उपास-तापासाचा अतिरेक हे इंद्रियाना दडपणे होय. निग्रहाऐवजी संयम पाहिजे—चांगले वळण पाहिजे. मिताहार हा संयम. सात्त्विक सुख घेणे, हा संयम.

स्वभावस्तु प्रवर्तते ।

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।
न कर्मफलसंयोगं; स्वभावस्तु प्रवर्तते ॥ (५·१४)

(परमेश्वर हा मनुष्याचे कर्तेपण, त्याची कर्मे व त्याला कर्माच्या फळाची जोड करून देणे, या गोष्टी निर्माण करीत नाही. पण त्याचा मूळ स्वभाव हे सर्व करीत असतो.)

'देवाच्या इच्छेने सर्व काही घडते; आपण निमित्तमात्र आहो; वाईट बुद्धी ही देवानेच दिली आहे,' असे म्हणून मनुष्य आपल्या जबाबदारीतून सुटत नाही. **नादत्ते कस्यचित् पापं न चैव सुकृतं विभुः ।** (५·१५) परमेश्वर हा कोणाचे पाप किंवा पुण्य घेत नाही. ते ज्याचे त्याचेच असते.

परमेश्वराने सृष्टी निर्माण केली आहे ती त्याने आपल्या मायेने. ही परमेश्वराची माया म्हणजेच प्रकृती किंवा निसर्ग. परमेश्वराने म्हणजे निसर्गाने आपल्याला आपला स्वभाव-आपले काही उपजत गुण दिले आहेत, मन व बुद्धी ही दिली आहेत. ही बरी-वाईट साधने आपल्याला दिलेली आहेत.

मुळात आपल्याला चांगले गुण किंवा बुद्धी मिळाली नसली तरी बुद्धी-पलीकडे आपला आत्मा आहे. वाईट करणाराला वाईट बुद्धी मोहामुळे होते, परंतु त्याला आपण वाईट करतो हे समजते. ही आत्म्याची प्रेरणा-सदसद्विवेक-बुद्धी होय. हिचा कौल घेऊन इंद्रियांवर-मनावर-जय मिळवता येतो, स्वभाव सुधारता येतो. उद्धरेद् आत्मना आत्मानम् । स्वतःचा उद्धार आपल्याला करता येतो. ज्ञान, भक्ती व सत्कर्म ही साधने आपल्या हातची आहेत.

-५५-

प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ।

यदहंकारमाश्रित्य न योत्स्ये इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥
(७८.५९)

(अहंकार, म्हणजे लढणारा ' मी ' आहे ही भावना-अहंभाव मनात बाळगून तू विचार करतोस की मी लढणार नाही. पण हा तुझा बेत व्यर्थ आहे. तुझा स्वभाव तुला लढणे भाग पाडील.)

अर्जुन हा शूर होता. लढणे हा त्याचा स्वभावधर्म होता. मी लढणार नाही, असे त्याने कितीही म्हटले तरी त्याच्या मूळ स्वभावाने हा त्याचा बेत हाणून पाडला असताच.

माणूस आपल्या मूळ स्वभावावर जातो आणि हेच योग्य आहे. ज्याचा मूळ स्वभाव कलावंताचा आहे तो रणांगणावर गेला तर त्याला नीट लढता येणार नाही. त्याने कलाकृती निर्माण करून लोकसेवा करणे हेच योग्य. आणि जो लढाईला लायक आहे, त्याने लढलेच पाहिजे. क्षणिक भावनेच्या आहारी जाऊन तो स्वस्थ [बसला तरी त्याचा स्वभाव उसळून येईल व त्याला लढायला लावील.

स्वभावाच्या ह्या सामर्थ्यामुळेच जग सुरळीतपणे चालले आहे.

□ □

चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्....

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।
तस्य कर्तारमपि मां विद्धि अकर्तारमव्ययम् ॥ (४.१३)

(चारही वर्ण-म्हणजे सर्व प्रकारची माणसे—मी त्यांचे गुण व त्यांस अनुसरून त्यांची कामे यांची वाटणी करून निर्माण केले. हे करणारा मी असूनही मी कर्ता नाही व मी बदलणारा नाही हे जाण.)

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण म्हणजे चार समाज होत. ह्या सर्वांना परमेश्वराने आपल्या मायेने निर्माण केले आहे. परमेश्वर हा वस्तुतः काहीच करीत नसतो. माया म्हणजे निसर्ग सर्व काही करतो. परमेश्वराने निसर्ग केला व निसर्गाने जग—जगातील विविधता निर्माण केली. परमेश्वर हे न बदलणारे असे चिरंतन तत्त्व आहे. ते जगाचे मूळ कारण आहे. विविध सृष्टी त्याने निरिच्छपणे एक लीला म्हणून केली आहे म्हणून तो कर्ता पण करून न केल्यासारखाच समजावा. कारण, आसक्ती नाही ते कर्म करून न केल्यासारखेच.

पूर्वी वडिलांचा व्यवसाय मुले करीत. त्यामुळे जन्मापासून त्यांना ते गुण प्राप्त झाले असे समजून तो त्यांचा धर्म झाला. त्यामुळे समाजाची घडी त्यावेळी चांगली बसली. कामाची वाटणी झाली. पण यामुळे जातिभेद झाले व समाजाची घडी विसकटली.

नवीन शास्त्रांनी मूळ स्वभाव असे ठराविक नसतात हे सिद्ध केले. अनुभवही तसाच आला. शूद्र दडपले गेले. धर्माला कलंक लागला. महात्माजींनी शूद्रता मानली नाही. अध्यात्मात समानतातत्त्व तर समाजात विषमता ही चूक लक्षांत आली. शास्त्राला प्रमाण मानावे असे गीताच सांगते. म्हणून आजची शास्त्रे आज प्रमाण मानावी व जातिभेद नष्ट करावे, हेच आज गीतेस धरून होईल.

तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते ।

तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
(१६.२४)

(म्हणून काय करावे, काय न करावे, हे ठरविण्यासाठी तू शास्त्र प्रमाण मान.)

शास्त्र म्हणजे धर्मशास्त्र–म्हणजेच नीतिशास्त्र. माणसाची कर्तव्ये शास्त्राने ठरवून दिली आहेत. ती शास्त्राप्रमाणे केली तर यश, सुख व अखेरी श्रेष्ठ गती म्हणजे मोक्ष मिळतो. माणूस सुखी व यशस्वी व्हावा यासाठी शास्त्र आहे. ते प्रमाण मानण्यातच आपले हित आहे.

समाजाची धारणा करणारा–आधार देणारा तो धर्म. पूर्वी चातुर्वर्ण्य हा धर्म होता. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांच्यामध्ये जन्मतःच वेगवेगळे गुण असतात असे मानून त्याप्रमाणे त्यांची कामे वेगवेगळी असावी, हे धर्माने ठरविले होते.

ह्या वर्णभेदाने जाती वाढल्या, द्वेष वाढले, सहकार्य कमी झाले व समाज दुबळा झाला. जन्मतः माणूस काही गुण घेऊन येतो परंतु बरेचसे गुण म्हणजे ज्ञान, शौर्य, धंद्यातील वाकबगारपणा इत्यादि परिस्थितीतून तो शिकतो, ही गोष्ट आता शास्त्राने सिद्ध केली आहे. म्हणून आज 'सर्वांना समान संधी' हे समतेचे शास्त्र प्रमाण मानावे. काळानुसार धर्मशास्त्र बदलत असते. तसे ते बदलत आले आहे.

स्वधर्मे निधनं श्रेयः ।

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ (३.३५)

(दुसऱ्याच्या मूळ स्वभावधर्मानुसार चांगले वागण्यापेक्षा आपल्या मूळ स्वभावधर्मानुसार वागणे हे श्रेयस्कर होय. आपल्या स्वभावधर्माने वागताना मरण आले तरी ते चांगले, हितकर आहे. पण दुसऱ्याच्या धर्मानुसार वागणे भयप्रद आहे.)

अर्जुन क्षत्रिय असल्यामुळे लढणे हा त्याचा स्वभावधर्म होता. तो सोडून तो आपले जीवन व्यर्थ घालविणार होता. आपले कर्तव्य करण्याने जीवनाचे सार्थक होते- मोक्ष मिळतो. ज्याला जे उत्तम येईल ते करण्यात समाजाचे व त्याचे हित असते. पूर्वी माणसांच्या गुणानुसार व कर्मानुसार चार वर्ण झाले. हा धर्म होता.

पण जन्मतः मनुष्य कोणते गुण घेऊन येईल हे सांगता येणार नाही. एखादा ब्राह्मणाचा मुलगा लढाऊ स्वभावाचा तर क्षत्रियाचा ज्ञानाच्या क्षेत्रात पात्र ठरेल. म्हणून आज जातिभेदात समाजाचे हित नाही. तथापि, प्रत्येक माणसात उपजत गुण वेगळे असतात. ते पाहून प्रत्येकाने आपला व्यवसाय ठरवावा व तोच मरेपर्यंत पाळावा. ज्याचे काम त्याने करावे हे आजही खरे आहे.

–५९–

स्वकर्म का करावे ?

स्वे स्वे कर्मणि अभिरतः संसिद्धिं लभते नरः। (१८.४५)

(आपापल्या कर्तव्यकर्मात आनंदाने गढून गेलेला मनुष्य पूर्णता प्राप्त करतो)

स्वतःचे काम सोडून दुसऱ्याच्या कामात लुडबुड करणारांना अपयश येते. आपले कर्तव्य मनापासून केले पाहिजे व त्यात पूर्णपणे लक्ष घालून ते आळस न करता सतत केले पाहिजे. आपले काम कसे करावे हे आपल्याला माहीत असते. आपल्या पात्रतेनुरूप व स्वभावानुरूप ते आपल्या वाट्याला आलेले असते. आपणच ते केले पाहिजे. " जेनुं काम तेनुं थाय. "

पूर्वी जन्मावरून जाती ठरत व पात्रता असूनही वरिष्ठ जातीची कामे करण्याची संधी मिळत नसे. पण आता सर्वांना समान संधीचे तत्त्व रूढ होत आहे. आता ज्याला जो लायक ते काम त्याला मिळणे बरेच सुलभ झाले आहे. जात आडवी येत नाही.

आपले कर्तव्य म्हणजेच धर्म. धर्म पाळला की देव मिळतो. हीच जीवनाची पूर्णता–हीच श्रेष्ठ सिद्धी. नागरिकाने आपले उत्कृष्ट काम राष्ट्रास दिले तर राष्ट्र बलशाली होते. त्यातच आपले यश सामावले आहे

□ □

७. ज्ञान

–६०–

ज्ञानाने पवित्र व्हा !

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । (४·३८)

(ह्या पृथ्वीवर ज्ञानासारखे पवित्र दुसरे काहीही नाही.)

भगवान् कृष्ण म्हणतात ' हे अर्जुना, तू पाप्यांहून पापी असलास तरी ज्ञानामुळे तुझा उद्धार होईल. ज्ञानाच्या होडीने तू पापाचा महासागर तरून जाशील. (४·३६) ' (सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ।) अग्नीची ठिणगी पडली की भडका उडून सारे भस्म होते. ज्ञानाच्या ठिणगीने सारी पापे जळून जातात. ' (४.३७)

ज्ञान ही छोटीशी गोष्ट. उदाहरणार्थ, ' दुसऱ्याच्या उपयोगी पडावे ' हे समजले आणि त्याप्रमाणे वागू लागलो की पाप हातून घडणारच नाही. पश्चात्तापाने मागील पापही धुऊन निघेल. पापी माणसाने धीर सोडू नये. ज्ञानाचे महत्त्व कमी मानू नये. ज्ञानाने जीवन उजळून निघेल. कोणीही निराश होण्याचे कारण नाही.

मात्र हे ज्ञान खरे ज्ञान हवे. खरे ज्ञान कोणते ? जे पवित्र म्हणजे मन शुद्ध करणारे ते ज्ञान. सर्व जगात ईश्वर भरला आहे, हे ते खरे ज्ञान. त्याने मनातले सर्व वाईट जळून जाते. साऱ्या प्राण्यात तसा साऱ्या वस्तूंत-दगड-मातीतही ईश्वर आहे. त्याचे ज्ञान व्हावे. मग जगात श्रेष्ठ कोण, कनिष्ठ कोण ? सारेच एक. सारेच भाऊभाऊ. दुसऱ्याला दुःख देणे म्हणजे ईश्वराला दुखविणे–आपल्याला दुखविणे. कारण आपणही ईश्वरच.

भगवान् म्हणतात, ' हे अर्जुना, ज्ञान झाले की तुला पुन्हा मोह होणार नाही. सर्व जग आपल्यात व माझ्यात, ही दृष्टी तुला येईल. ' येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि । (४·३५)

ज्ञान असे मिळवा !

तद् विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । (४.३४)

(ते-ज्ञान-नम्र नमस्कार, सतत प्रश्न व सेवा यांच्या योगाने तू जाणून घे).

हे अर्जुना, तू स्वतः प्रयत्नपूर्वक ते ज्ञान करून घे. गुरूंना आदरपूर्वक नमस्कार कर, त्यांना सतत प्रश्न विचारीत जा व त्यांची सेवा कर. ही तुझी ज्ञानोपासना पाहून ते तुला ज्ञानाचा उपदेश करतील. गुरू हे ज्ञानी व सत्य पाहणारे द्रष्टे असतात. उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ।

ज्ञान आपण होऊन आपल्याकडे चालून येत नाही. त्यासाठी स्वतःच योग्य मार्गाने प्रयत्न केले पाहिजेत. श्रद्धेशिवाय, निष्ठेशिवाय हे होणार नाही. ज्ञानोपासना हे तप आहे. प्रथम गुरूंविषयी आदर पाहिजे. त्यांचा आदर म्हणजे विद्येचा-ज्ञानाचा आदर. ज्ञानाचा आदर केला नाही तर ते तरी तुमच्याकडे कसे येईल – तुमची पर्वा का करील ?

गुरूंचा आदर करणे म्हणजे त्यांना निव्वळ औपचारिक नमस्कार करणे नव्हे. त्यांनी सांगितलेले गृहपाठ, वर्गपाठ, नियमितपणे व मनापासून केले पाहिजेत. आपली प्रगती दाखवून त्यांना यश दिले पाहिजे.

ग्रंथही गुरूच होत. त्यांचे श्रद्धापूर्वक वाचन, मनन केले पाहिजे. तरच ते प्रसन्न होऊन ज्ञान देतील.

जिज्ञासा हे ज्ञानाचे मूळ आहे. ज्ञानविषयांवर चिंतन करून स्वतंत्रपणे ते आत्मसात् केले पाहिजे. शंका गुरूंना विचारल्या पाहिजेत. प्रयोग करून शंकानिरसन केले पाहिजे. ज्ञान परिपूर्ण हवे. तेथे शंका राहून उपयोगी नाही. कच्च्या भिंतीसारखे ते केव्हाही ढासळू नये. शिकतो ते आपणच. गुरुजी केवळ उपदेश म्हणजे मार्गदर्शन करतात.

शाळेची शिस्त पाळणे म्हणजेच गुरूची सेवा. त्यांचे कामात त्यांना सहकार्य द्यावे. नाहीतर बेशिस्तीला आळा घालण्यातच त्यांचा वेळ जाईल. मग शिक्षण मागे पडेल.

-६२-

ज्ञान कोणाला मिळेल ?

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः। (४.३९)

(निष्ठावंत, ज्ञान हेच सर्वस्व मानणारा, आत्मनिग्रही, अशाला ज्ञान लाभते.)

ज्ञान–मग ते कोणतही असो–मिळवायचे म्हणजे त्या ज्ञानावर श्रद्धा हवी. उगाच शाळेत जायचे म्हणून जाणाराला विद्या येणार कशी ? विद्येचा ध्यास लागला पाहिजे. विद्या मिळविल्याशिवाय चैन न पडले पाहिजे-अन्नही गोड न लागले पाहिजे. विद्या ही एकच श्रेष्ठ वस्तू आहे, ही भावना मनात पाहिजे. 'विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व ह्या जगामाजी।' ह्या श्रद्धेनेच अभ्यासात गोडी वाटेल, अभ्यासात लक्ष लागेल, एकाग्रता होईल. एकाग्रतेशिवाय समजत नाही. सारे अवघड वाटते–येणार नाही असे वाटते. बुद्धी साऱ्यांनाच असते. थोडी कमी असली तरी ती पुरेशी असते. पण परीक्षेत अपयश येते ते श्रद्धा-आत्मविश्वास–ही नसल्याने.

ही श्रद्धा खरी पाहिजे–स्वतःवर, स्वतःच्या प्रयत्नावर पाहिजे. आपल्याला येईल हा विश्वास धरावा. एकलव्य स्वप्रयत्नाने, आत्मविश्वासाच्या बळावर, मोठा धनुर्धर झाला.

न समजता घोकपट्टी करणाराचा स्वतःवर, स्वताच्या बुद्धीवर, विश्वास नसतो. दुसऱ्यावर असतो–आयत्या उत्तरांवर असतो. परिणाम काय होतो ? ' जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला. '

स्वतःवर ताबा पाहिजे. पहाटेच्या गुलाबी झोपेचा मोह नको. भलत्या वेळी खेळण्याचा–सिनेमांचा–गप्पागोष्टींचा मोह नको. बैठक मारून अभ्यास त्याशिवाय होणार नाही. संयतेंद्रिय व्हा. सुखार्थिनः कुतो विद्या, कुतो विद्यार्थिनः सुखम्।

ज्ञान कशाला ?

ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति । (४·३९)

(ज्ञान मिळाल्यावर लगेच खरी श्रेष्ठ मनःशांती मिळते.)

सुखामागे लागणारांस ज्ञान मिळत नाही हे खरे, पण चैन म्हणजे खरे सुख नव्हे. चैनीचा आनंद तात्पुरता असतो. परिणामी दुःखच भोगावे लागते. ज्ञानामुळे मात्र खरे सुख मिळते.

सुखासाठीच साऱ्यांची धडपड असते. त्याशिवाय चैन पडत नाही. खरे सुख मिळते ते ज्ञानाने व सुखाशिवाय शांतता नाही मनाची. ज्ञान झाले की ही शांतता लगेच मिळते.

ज्ञानी माणसाची मुद्रा पहा. तीवर एक प्रकारची प्रसन्नता व शांतता विलसत असते. किती लोक असे दिसतात आपल्याला ? श्रीमंत असतात, सत्ताधीश असतात, समाजात प्रतिष्ठित मानलेले असतात. इतरांना त्यांचा हेवाही वाटतो. पण त्यांचे चेहरे पहा. प्रसन्नता–शांतता दिसते का त्यांवर ? उलट ज्ञानी माणूस दरिद्री असो, कोणत्याही संकटात असो, त्याच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता, मनाची शांतता ढळायची नाही. ही माणसे कधी रागावणार नाहीत, चिडणार नाहीत. त्यांना शत्रू नसतात. सारे मित्र, सारे बंधू. मग अस्वस्थतेला जागाच नाही. आनंदमय ईश्वराशी ते एकरूप झालेले असतात. अशा सत्पुरुषांचे दर्शन घेऊन पावन व्हावे.

□ □

-६४-

ज्ञानाचे मूळ

सत्त्वात्संजायते ज्ञानम् । (१४·१७)

(सत्त्वापासून ज्ञान उत्पन्न होते.)

ज्ञानाचा व सुखाचा उगम सत्त्वात आहे. जे उत्कृष्ट-उत्तम, त्यात सत्त्व-गुण असतो. आपण दुःखी व अज्ञानी राहतो. ज्ञानात प्रगती होत नाही, याचे कारण आपण ज्ञानाचा उत्कृष्ट मार्ग अनुसरत नाही. अज्ञान हा तामसीपणा-अंधार होय. अंधार म्हणजे अज्ञान. अज्ञानं तमसः फलम् ।

उत्कृष्ट ग्रंथांचे वाचन, उत्तम मित्रांचा सहवास, उत्कृष्ट चित्रे, निसर्गाची दृश्ये, कलाकृती यांचे दर्शन ह्यामुळे उच्च दर्जाचे सुख-सात्त्विक सुख होते व ह्या सुखातून ज्ञानाची प्राप्ती होते. ज्ञानी माणसाची मुद्रा प्रसन्न दिसते ती यामुळेच. ज्ञानानंद हा श्रेष्ठ आनंद होय.

जिज्ञासाप्रवृत्ती ही सात्त्विक होय. ज्ञानाने चांगले काय ते समजते व त्याप्रमाणे आपण वागतो. सत्त्वशील होतो. चांगले वर्तन हे खऱ्या ज्ञानाचे गोड फळ होय.

शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना चांगल्याची गोडी लागली, ते सद्वर्तनी बनले तरच त्यांना ज्ञान मिळाले असे होईल.

□ □

सात्त्विक ज्ञान

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम्॥ (१८·२०)

(वेगवेगळ्या सर्व प्राण्यांमध्ये ज्यामुळे एकच अविनाशी एकसारखे तत्त्व दिसते, ते सात्त्विक ज्ञान आहे असे जाण.)

जगामध्ये सर्वत्र ईश्वरी तत्त्व प्रत्येक वस्तूत भरलेले आहे. भेद हे खरे नाहीत. ते नष्ट होतात. पण जे कायम राहते ते ईश्वरी तत्त्व. ते सर्वांत सारखे आहे.

भौतिक शास्त्रांमुळे देखील पदार्थांच्या पृथक्करणाने त्यांतील घटकांचे व त्यांच्या गुणधर्मांचे ज्ञान होते. त्यांची अधिक खोल तपासणी व तुलना केल्यावर सर्वांतील सूक्ष्म सारखेपणाचा शोध लागतो. प्राणी व वनस्पती हे भिन्न, परंतु वनस्पतींना भावना असते हा शोध जगदीशचंद्र बसू यांनी लावला आहे.

ह्या एकतेच्या ज्ञानामुळे आपलेपणा वाढतो, कलहाचे बीजच नाहीसे होते म्हणून ते ज्ञान सात्त्विक. सर्वांचे दुःख ते आपले समजून परोपकार करणारे व त्यांच्या सुखात आपले सुख पाहणारे सत्पुरुष हे खरे सात्त्विक ज्ञानी होत. ह्याच ज्ञानाने जगाचे तारण केले आहे. न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते। ह्या ज्ञानासारखे पवित्र असे पृथ्वीवर दुसरे काही नाही.

□ □

–६६–

ज्ञानी भक्त

प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः (७.१७)

(ज्ञानी भक्ताला मी अत्यंत प्रिय वाटतो आणि तो मला प्रिय असतो.)

परमेश्वर कसा आहे हे ज्याला समजले त्यालाच त्यामुळे त्याची खरी आत्यंतिक आवड–भक्ती असणार. जे समजले नाही त्याची खरी आवड उत्पन्न होणार नाही. आंधळी भक्ती ही कमी दर्जाची आहे. ज्ञानाने देवा-विषयीची आवड–भक्ती दृढ होते व असा अत्यंत प्रेमळ भक्त हा देवाला प्रिय असतो. ज्ञानोत्तर भक्ती हा भक्तीचा आदर्श होय.

अर्थात हे ज्ञान खरे पाहिजे. ईश्वर सर्वांमध्ये आहे ही जाणीव ठेवणे व त्यानुसार सर्वांशी आपलेपणाने वागणे – आपपरभाव न बाळगणे, हे ते खरे ज्ञान. अशा ज्ञानी माणसाची भक्ती म्हणजे दुधात साखरच. देवाला असा भक्तच सर्वांत प्रिय वाटतो. स्वार्थी हेतूने द्रव्यासाठी, यशासाठी, संकटातून देवाने सोडवावे म्हणून देवाला भजणारे भक्त हे चांगलेच (उदारा एव सर्वे एते ।) परंतु ज्ञानी भक्त म्हणजे प्रत्यक्ष देवच. म्हणून तोच देवाला प्रिय व अगदी आपला वाटतो. ज्ञानी आत्मा एव मे मतम् ।

ज्ञानी भक्त हा देव कसा ? तो सर्व प्राण्यांचे हित करण्यात मग्न असतो. (सर्वभूतहिते रतः ।) आणि ईश्वर हा सर्वांना समतेने वागवतो (समोऽहं सर्वभूतेषु ।) आणि तो सर्व जगाचा पिता पालनकर्ता आहे (पिताहमस्य जगतः ।).

श्रेयो हि ज्ञानम् अभ्यासात् ।

श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् ज्ञानात् ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलस्त्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥ (१२·१२)

(अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ. ज्ञानापेक्षा चिन्तन विशेष चांगले. चिन्तनाहून कर्मफळाचा त्याग श्रेष्ठ. कारण त्याग केल्यावर लगेच मनाला शांती मिळते.)

ईश्वराच्या ठिकाणी मन जडावे यासाठी पहिला सोपा मार्ग अभ्यास, म्हणजे इतर गोष्टींवरचे लक्ष काढून ते ईश्वराकडे वळवण्याचा सतत प्रयत्न करणे. अभ्यास म्हणजे सराव. सरावामुळे अवघड गोष्ट सोपी होते. सर्क-शीत जी अचाट कामे होतात त्यासाठी मोठ्या मेहनतीने सतत सराव केलेला असतो. शाळेतील अभ्यासावाबत हेच लक्षात ठेवावे. मेहनतीने सराव केल्याने अवघड विषय येतो.

पण हा अभ्यास यांत्रिक नको. विचाराची जोड त्याला हवी. विचाराने ज्ञान प्राप्त होते व ते अभ्यासाहून श्रेष्ठ. ज्ञानाशिवाय—समजल्याशिवाय—घोकंपट्टी व्यर्थ होय. ईश्वराविषयी विचार करून ज्ञान होते. ज्ञानापेक्षा चिंतन श्रेष्ठ, कारण त्याने ज्ञान सतत ताजे राहते. ते पक्के होते. ईश्वराचे नुसते ध्यान करूनही फायदा नाही. ध्यानातून त्यागभावना निर्माण झाली पाहिजे. आपण जी कामे करतो त्यांचे फळ आपल्याला हवे असते. ते मिळाल्या शिवाय चैन पडत नाही. ही स्वार्थी बुद्धी सोडली, आशेचा त्याग केला की मन शांत होते. मिळाल्याचा आनंद किंवा न मिळाल्याचे दुःख, ही मनात चल-बिचल करीत नाहीत. ते शांत-स्थिर बनते. ज्ञानाची परिणती त्यागात व्हावी. त्यागाशिवाय शांतता नाही आणि शांततेवाचून खरे सुख नाही.

ज्ञानयज्ञ

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥ (१८'७०)

(आपल्या दोघांच्या या धर्मविषयक संवादाचे जो अध्ययन करील त्याने माझ्यासाठी ज्ञानरूप यज्ञ केला असे होईल असे माझे मत आहे.)

माणसाने जगात कसे वागावे, त्याचा धर्म काय, ह्याचे ज्ञान ह्या गीता-संवादामध्ये होते. ह्या दृष्टीने गीतेचा अभ्यास करणे म्हणजे ज्ञानयज्ञच होय.

यज्ञात आहुती देऊन देवाला संतुष्ट करतात. तूप, पशू, तांदळाचा रोडगा इ. नाना द्रव्यांच्या आहुती यज्ञात देतात. ह्या द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ होय. **श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः ।** (अध्याय ४ श्लोक ३३ पाहा) कारण आत्मज्ञान हे सर्व कर्मांचे अंतिम साध्य होय. ज्ञान झाले की कर्म संपले, मोक्ष मिळाला.

ज्ञान हे स्वतःच्या फायद्यासाठी नाही. ईश्वरासाठी केलेला तो यज्ञ आहे. यज्ञामध्ये त्याग करावा लागतो. ज्ञानप्राप्तीसाठी अहंभाव सोडावा लागतो. आपण जगाशी परमेश्वराशी एकरूप व्हावे लागते. मग 'माझे' व 'मी' ही गोष्टच रहात नाही. 'मी'पणाच्या त्यागाहून मोठा त्याग कोणता ?

ह्या ज्ञानयज्ञाने ईश्वराची पूजा होते. जीवन ईश्वराला समर्पण केले जाते.

□ □

-६९-

गीता कोणास सांगावी

न च अशुश्रूषवे वाच्यम् । (१८.६७)

(ऐकण्याची इच्छा नसणाराला ही गीता सांगू नकोस.)

गावढ्यापुढे गीता वाचली तर त्याला तिच्यापेक्षा रात्रीचा गोंधळच बरा वाटणार. 'अधिकार तैसा करू उपदेश ।' गीता ऐकण्याचा अधिकार म्हणजे पात्रता कोणाला ? जो तप म्हणजे कष्ट करील, ज्याला गीतेविषयीची आवड–भक्ती–आहे व ज्याला ईश्वराविषयी आदर आहे, अशालाच गीता सांगून फायदा. नाहीतर पालथ्या घड्यावर पाणी !

वेद व गीता यांसारखे ग्रंथ, तसेच उच्च प्रतीचे ज्ञान ह्यासाठी काही प्राथमिक तयारी हवी. विद्यापीठात प्रवेशासाठी अटी असतात. त्यामुळे ज्ञानदान परिणामकारक होते. आज शिक्षणाचा कस उतरला आहे म्हणतात, तो जर वाढवावयाचा तर प्रत्येक स्तरावर चांगल्या परीक्षा–कसोट्या– हव्या. त्यांत जो यशस्वी ठरेल त्यालाच पुढे यश मिळेल. परीक्षा सोप्या करणे हा उच्च दर्जाच्या शिक्षणाचा प्रसार करण्याचा मार्ग नव्हे. शिस्त, ज्ञानाविषयी निष्ठा, गुरुजनांविषयी आदर, ह्यांशिवाय शिक्षण फलदायी होणार नाही.

□ □

८. बुद्धी

-७०-

बुद्धीचा आधार

बुद्धौ शरणमन्विच्छ । (२.४९)

(समबुद्धीत आश्रयस्थान शोध–समबुद्धीचा आधार घे.)

आपण कामे करतो ती काही स्वतःला मिळावे म्हणून. ही स्वार्थी बुद्धी होय. पण अखेरीस आपण यशाने हुरळून जातो; नाहीतर अपयशाने खचून जातो. स्वार्थापायी दुष्ट कृत्येही हातून घडतात.

ह्या स्वार्थी बुद्धीपेक्षा शुद्ध, निःस्वार्थी बुद्धीने–केवळ कर्तव्य म्हणून काम केल्यास जीवनात शांतता व सुख ही लाभतात. हीच खरी श्रेष्ठ बुद्धी होय. हिच्यातच माणसाचे अंतिम हित आहे. म्हणून ह्या निष्काम, निःस्वार्थ-बुद्धीचा आपण आधार घेतला पाहिजे.

सुख मिळो वा दुःख भोगावे लागो, यश मिळो वा पराजय, मान मिळो वा अपमान, सर्व परिस्थितीत मन खंबीर, स्थिर ठेवायचे तर ही सम बुद्धी हवी. हाच बुद्धियोग. कर्मयोग आचरायचा तो ह्या बुद्धीने.

समत्वबुद्धीचा माणूस सर्वांना आपल्यासारखे मानील. भेदभाव करणार नाही, सर्वांचे हित तेच आपले समजून लोककल्याणार्थ झटेल. प्रसंगी प्राणार्पणही करील. ह्या बुद्धीच्या योगाने तो कृतार्थ होईल.

बुद्धी म्हणजे नुसती हुशारी नव्हे. चोरही हुशार असतात. विद्वत्ता, ज्ञान ही देखील मानवजातीच्या उपकारार्थ कामी आली तरच ती खरी. संहारक ॲटमबॉम्ब तयार करणारे ज्ञान ही शुद्ध बुद्धी नव्हे. त्यात जगाचा नाश आहे. निःस्वार्थ बुद्धी, समभाव–परोपकार–ह्यातच जगाला आधार आहे.

-७१-

शुद्ध बुद्धी कशाला

बुद्धिनाशात् प्रणश्यति। (२·६३)

(बुद्धीचा नाश झाला की माणसाचा सर्वनाश होतो.)

बुद्धी ही मनुष्याला मिळालेली मोठी देणगी आहे. माणूस हा सर्व प्राण्यांमध्ये आपल्या बुद्धीमुळेच श्रेष्ठ ठरला आहे. पण खरी बुद्धी म्हणजे माणुसकी. ज्या बुद्धीमुळे माणूस अण्वस्त्रे निर्माण करून मानवाचा संहार करतो ती खरी बुद्धी—सद्बुद्धी नव्हे. तसेच स्वार्थबुद्धीने दुसऱ्यास फसविणे, त्याचा घात करणे व स्वतःचे सुख तेवढे पाहणे हीही खरी बुद्धी, शुद्ध बुद्धी नव्हे. ती केवळ पाशवी बुद्धी होय. पशूदेखील पुष्कळदा माणसांपेक्षा चांगले वागतात.

बुद्धीचा म्हणजे माणुसकीचा हा नाश क्रमाक्रमाने होत जातो. बाह्य सुखांचा विचार केल्यामुळे माणूस त्यांत गुंततो. मग त्याच्या मनात त्या सुखांचा लोभ बळावतो. आपल्या आड येणाराचा राग येतो. रागाने माणूस वेडा होतो. आपण कोण, आपण काय करावे, हे तो विसरतो. त्याच्या बुद्धीला भ्रम पडतो व ती नष्ट होते. बुद्धी गेली की माणुसकीच गेली. माणूस पशूहून पशू बनतो. म्हणून चैनीमागे न लागणे, मोहांपासून दूर राहणे हेच इष्ट. बुद्धीची जपणूक आत्मसंयम, म्हणजे योग, व निःस्वार्थीपणा यांनीच करायला हवी.

□ □



प्रसन्न मन

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ (२·६५)

(मन प्रसन्न झाल्यावर त्याची सर्व दुःखे नाहीशी होतात. प्रसन्न मनाच्या माणसाची बुद्धी ताबडतोब सर्वतोपरी स्थिर होते.)

माणूस दुःखी होतो याचे कारण राग, द्वेष इत्यादि विकार. हे जिंकले की मन प्रसन्न होते. दुःखे नाहीशी करण्याचा हा उपाय आहे. कोणाचा द्वेष करू नये. राग करू नये. ज्याची बुद्धी स्थिर आहे–चंचल नाही– क्षणिक सुखांच्या मागे धावत नाही त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात. त्याचे मन खंबीर असते. त्याला कशाचा मोह नसतो. त्यामुळे अशा मनाच्या माणसा-कडून थोर कामे सहज पार पडतात.

ही स्थिर बुद्धी प्राप्त कशाने होईल हा मोठा प्रश्न आहे, परंतु त्याचे उत्तर अगदी सोपे आहे. मन प्रसन्न असले की बुद्धी लौकर स्थिर होते.

प्रसन्न मन म्हणजे स्वच्छ, निर्मळ मन. कोणाचा द्वेष नाही, कशाचा लोभ नाही, स्वार्थ नाही, अज्ञान नाही, ते शुद्ध–पवित्र–प्रसन्न मन. गंगे-सारख्या नदीचे स्वच्छ, विशाल शीतल पाणी ते प्रसन्न तीर्थ. जगाची तहान भूक हरवीत, परोपकार करीत, सतत संथपणे ते अहोरात्र वाहत असते–नाना अडचणींतून मार्ग काढीत पुढे जात असते. नदीवर स्नानासाठी सकाळी आलेले वाल्मिकी ऋषी शिष्याला म्हणतात, 'वत्सा, हे नदीचे प्रसन्न जल पाहा. जसे सज्जनांचे मनच.' शांत, स्वच्छ, विशाल, सुंदर ! (**रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा ।**) शिष्याने असे सज्जन व्हावे ही वाल्मिकींची शिकवण. परोपकार करणारालाच असे प्रसन्न मन लाभते.

बुद्धी म्हणजे योग

नास्ति बुद्धिरयुक्तस्य । (२.६६)

(ज्याचे मन विस्कळित-चंचल आहे, नीट जोडलेले नाही त्याला बुद्धी प्राप्त होणार नाही.)

मन हे एखाद्या यंत्रासारखे आहे. ते नीट जोडलेले असेल तरच नीट चालेल-नाहीतर वेड्यासारखे धावेल. घड्याळाची चक्रे वाटेल तशी फिरू लागली तर घड्याळ बिनचूक वेळ दाखवणार नाही. ते फेकूनच द्यावे लागेल. मनाचेही असेच आहे. मोहामागे धावणारे मन वायाच गेले.

मन जोडायचे म्हणजे कसे ? माणसाचे-मानवी समाजाचे हित कशात आहे, आपल्या जीवनाचा अर्थ काय, ध्येय काय, हे नीट ओळखून त्यासाठी सतत आपल्या शक्ती कामी लावील, असे मन हवे. माणसाचे विविध गुण, ज्ञान, कला, त्याचे बळ, ह्या उदात्त ध्येयाकडे वळावे. मग त्याची बुद्धी स्थिर होईल. बुद्धीचे सामर्थ्य स्थिरतेत आहे. डगमगणाऱ्या खांबात बळ नसते. बुद्धी पक्की करा. मग तुमचे ध्येय साध्य होईल. खेळ येईल, कला येईल, ज्ञान येईल, सारे येईल. हाच योग.

चंचल मनात भक्ती नसते. **न चायुक्तस्य भावना** । भावनेशिवाय— भक्तीशिवाय, निष्ठेशिवाय शांतता नाही. आणि शांततेशिवाय सुख कोठून ? **अशांतस्य कुतः सुखम्** । खऱ्या सुखाचा खरा मार्ग शांती हा आहे.

□ □

९. भक्ती

–७४–

देव भावाचा भुकेला

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ (९.२६)

(पान, फूल, फळ किंवा नुसते पाणी—काहीही असो—मला जो ते भक्तीनें देतो, ती पवित्र अंतःकरणाच्या माणसाची भक्तीची भेट म्हणून मी सेवन करतो.)

सर्वशक्तिमान् परमेश्वराला काय कमी आहे ? पण गरीब भक्ताने त्याला पान, फूल किंवा नुसती पाण्याची ओंजळ जरी अर्पण केली तरी देव त्याचा आदर करतो. कारण पवित्र अंतःकरणाची ती भेट असते. तो भक्ती पाहतो-दिलेल्या वस्तूची किंमत पहात नाही. देव भावाचा भुकेला. त्याला माणसांचे प्रेम पाहिजे आहे. त्याला थोडक्यात समाधान आहे. योग्याप्रमाणे तोही आहे—संतुष्टो येन केनचित् । मोठमोठी मंदिरे, मूर्तींवर हिऱ्यामाणकांचे मुकुट, दाग-दागिने हा थाट देवाला नको. त्याला भक्तीचा थाट-भक्तीचा सोहळा हवा आहे. त्या भक्तीत तो रंगतो. आपणही असेच वागले पाहिजे. मित्रांचे मोल त्यांच्या श्रीमंतीवर किंवा त्यांनी आपल्याला काय दिले त्यावर करू नये. लग्ना-सारख्या प्रसंगी शुभेच्छांचे मोल आहेरांच्या किंमतीवर करू नये. शुभेच्छेपेक्षा आपल्या श्रीमंतीचे व प्रतिष्ठेचे प्रदर्शन करण्याचा त्यात हेतू असू शकतो.

□ □

—७५—

भक्त्या मामभिजानाति ।

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ।

(१८.५५)

(मी खरोखर केवढा व कोण आहे हे माझ्या परम भक्ताला पूर्ण समजते.)

सर्व प्राणिमात्रांना सारखे समजणाऱ्याला माझी श्रेष्ठ भक्ती प्राप्त होते. अशा परमभक्ताला ईश्वराचे ज्ञान पूर्णपणे होते. कोणतेही ज्ञान भक्तीशिवाय निष्ठेशिवाय–तळमळीशिवाय मिळत नाही. मग ईश्वराचे ज्ञान जे अत्यंत गूढ-कठिण, ते प्राप्त होण्याला पराकाष्ठेची भक्तीच पाहिजे. ज्ञानापूर्वी आधी भक्ती पाहिजे. ज्ञानाची ती तयारी आहे म्हणून भक्तीचे महत्त्व आहे.

भक्ती म्हणजे प्रेम-आवड. आवड असेल, निष्ठा असेल तरच ज्ञान होईल



-७६-

समः सर्वेषु भूतेषु ।

समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् । (१८.५४)

(सर्व प्राण्यांना सारखे मानणाऱ्याला माझी श्रेष्ठ भक्ती लाभते.)

सर्व प्राण्यांत एकच देव आहे म्हणून ते सारखे. तू-मी हा भेद खोट सर्वांचे सुख ते आपले सुख. ते दुःखी तर आपण दुःखी, ही भावना झाली क परोपकार करण्याची बुद्धी होते. हीच खरी श्रेष्ठ ईश्वरभक्ती. लोकसेवा त ईशसेवा. म्हणूनच 'परोपकारः पुण्याय, पापाय परपीडनम् ।' हे धर्माचे सा आहे. 'अहिंसा परमो धर्मः ।' अहिंसा हा श्रेष्ठ धर्म आहे. माणसांनाच नव्हे तर सर्व प्राण्यांना सारखे लेखणे हा विश्वधर्म. ह्या भावनेनेच जगात सुख व शांतता ही नांदतील.

–७७–

मन्मना भव मद्भक्तो....

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेव एष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥
(१८.६५)

(माझ्या ठिकाणी मन लावणारा असा माझा भक्त हो, माझ्यासाठी यज्ञ करणारा हो, मला नमस्कार कर. तू (अशाने) माझ्याकडेच येशील. मी तुला हे खरोखर वचन देतो. तू माझा आवडता आहेस.)

देवाच्या ठिकाणी मन जडले पाहिजे. मनापासून देवाची भक्ती हवी– केवळ बाह्य, दिखाऊ नको. देवासाठी यज्ञ म्हणजे त्याग केला पाहिजे. लोकहितासाठी आपले सर्वस्व अर्पण करणे हा यज्ञ होय. या यज्ञाने देव संतुष्ट होतो.

देवापुढे नमले पाहिजे, आपला गर्व सोडला पाहिजे–अहंकार गेला पाहिजे. देवाचे श्रेष्ठत्व मानून त्याच्यापुढे मान वाकवली पाहिजे. अशा भक्तीने माणसाला देव भेटतो. देवाने असे आश्वासन दिले आहे. देवाला भक्त प्रिय वाटतो.

□ □

-७६-

समः सर्वेषु भूतेषु ।

समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् । (१८.५४)

(सर्व प्राण्यांना सारखे मानणाऱ्याला माझी श्रेष्ठ भक्ती लाभते.)

सर्व प्राण्यांत एकच देव आहे म्हणून ते सारखे. तू-मी हा भेद खोटा. सर्वांचे सुख ते आपले सुख. ते दुःखी तर आपण दुःखी, ही भावना झाली की परोपकार करण्याची बुद्धी होते. हीच खरी श्रेष्ठ ईश्वरभक्ती. लोकसेवा ती ईशसेवा. म्हणूनच 'परोपकारः पुण्याय, पापाय परपीडनम् ।' हे धर्माचे सार आहे. 'अहिंसा परमो धर्मः ।' अहिंसा हा श्रेष्ठ धर्म आहे. माणसांनाच नव्हे तर सर्व प्राण्यांना सारखे लेखणे हा विश्वधर्म. ह्या भावनेनेच जगात सुख व शांतता ही नांदतील.



□ □

—७७—

मन्मना भव मद्‌भक्तो....

मन्मना भव मद्‌भक्तो मद्‌याजी मां नमस्कुरु ।
मामेव एष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥

(१८.६५)

(माझ्या ठिकाणी मन लावणारा असा माझा भक्त हो, माझ्यासाठी यज्ञ करणारा हो, मला नमस्कार कर. तू (अशाने) माझ्याकडेच येशील. मी तुला हे खरोखर वचन देतो. तू माझा आवडता आहेस.)

देवाच्या ठिकाणी मन जडले पाहिजे. मनापासून देवाची भक्ती हवी—केवळ बाह्य, दिखाऊ नको. देवासाठी यज्ञ म्हणजे त्याग केला पाहिजे. लोकहितासाठी आपले सर्वस्व अर्पण करणे हा यज्ञ होय. या यज्ञाने देव संतुष्ट होतो.

देवापुढे नमले पाहिजे, आपला गर्व सोडला पाहिजे—अहंकार गेला पाहिजे. देवाचे श्रेष्ठत्व मानून त्याच्यापुढे मान वाकवली पाहिजे. अशा भक्तीने माणसाला देव भेटतो. देवाने असे आश्वासन दिले आहे. देवाला भक्त प्रिय वाटतो.



□ □

मामेकं शरणं व्रज ।

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ (१८.६६)

(सर्व इतर धर्म-मार्ग-सोडून मला एकट्याला शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. शोक करू नकोस.)

धर्म म्हणजे कर्तव्य. माणसांचे सर्वांत श्रेष्ठ कर्तव्य म्हणजे ईश्वराची प्राप्ती. ही ईश्वराची प्राप्ती मनुष्य नाना मार्गांनी करण्याचा प्रयत्न करतो. कोणी जप करतो, कोणी तप करतो, कोणी ज्ञानसाधन करतो. कोणी यज्ञयाग, व्रतेवैकल्ये करतो तर कोणी लोकसेवा करतो. हे सर्व वेगवेगळे धर्म.

हे सारे धर्म आचरणे कठिण असते. ते माणूस आपल्या शक्तीनुसार व आवडीनुसार करतो. सारेच धर्म चांगले. ज्याला जसे व जे जमेल ते त्याने करावे.

पण अर्जुनासारखी स्थिती होऊन मनुष्य गोंधळून गेला, कोणता धर्म चांगला हे ठरवता न आले, तर काय करावे ? युद्धही कर्तव्य व प्राणिमात्रावर दया करणे हाही धर्मच. दोन धर्मांच्या ओढाताणीत माणूस गोंधळून जातो.

अशा वेळी सारे विचार सोडून एका ईश्वराला शरण जावे. हृदयस्थ ईश्वराचा कौल घ्यावा. ईश्वराने सारे जुळवून आणून आपल्यापुढे आपले काम ठेवले आहे. कठोरपणाने ते पार पाडावे. शोक करू नये. देवाने जे हातून घडविले त्यात पाप कसले ? मात्र ईश्वरी प्रेरणेने ते करावे. स्वार्थबुद्धीने, क्रोधाने ते केले तर पाप लागेल.

-७९-

तस्याहं न प्रणश्यामि ।

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ (६·३०)

(जो मला सगळीकडे पहातो व सर्व माझ्यामध्ये आहे हे पाहतो, त्याला मी कधी नाहीसा होत नाही आणि तो मला कधी नाहीसा होत नाही.)

सर्व जगात ईश्वर भरलेला आहे व सर्व जग हे ईश्वरामध्ये आहे कारण ईश्वरापासूनच सर्व जग निर्माण झाले आहे. हे ज्याला कळले तो योगी. तो समदृष्टीने जगाकडे पहातो. त्याचा आपपर भाव नाहीसा झालेला असतो. दुसऱ्याचे सुख ते त्याचे सुख–दुसऱ्याचे दुःख ते त्याचे दुःख.

अशा रीतीने तो विश्वरूपच झाल्यावर परमेश्वर त्याच्यापासून दूर नाही व परमेश्वरालाही तो दूर वाटत नाही. तो ईश्वराशी तादात्म्य पावतो–ईश्वररूपच होतो. ईश्वर त्याचा होतो व तो ईश्वराचा होतो. देवाचे भक्ताशी असे जवळचे नाते असते. देव त्याला अंतर देत नाही. कारण देवाला तो कधी अंतर देत नाही–सतत देवच त्याला सर्वत्र दिसत असतो. सर्वांना तो समान लेखतो. ' सर्वत्र समदर्शनः ' असा तो वागतो.

-८०-

पतितांना आशा

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः ॥ (९·३०)

(एखादा अतिशय दुराचरणी माणूस देखील असला तरी जर तो माझी अनन्यभावाने भक्ती करीत असेल तर त्याला सज्जनच समजावे. कारण, तो चांगले वागू लागलेला असतो.)

माणूस केव्हाही सुधारू शकतो. पाप वाईट आहे—माणूस नव्हे. परमेश्वर हे जाणतो. माणूस कितीही पापी असला तरी पश्चात्ताप झाल्यास तो साधू बनू शकतो. 'पश्चात्तापेन शुध्यति ।' वाटमाऱ्या वाल्याचा असाच वाल्मीकी ऋषी झाला.

'पश्चात्ताप करा म्हणजे तुम्हांला क्षमा केली जाईल.' 'Repent and you will be forgiven,' असे ख्रिस्ताने आश्वासन दिले आहे. पश्चात्तापाने पापे जळतात. मग तो मनुष्य साधूच समजला पाहिजे. जो पश्चात्तापाने पोळला त्याला तीच शिक्षा पुरी झाली. सुधारण्याचा-उन्नतीचा, मोक्षाचा मार्ग त्याला खुला झाला. जो चांगले वागतो तो साधू. 'झाले गेले गंगेला मिळाले,' अशी वृत्ती परमेश्वराची असते. तो दयाळू-'सर्वभूतहिते रतः' असतो.—पतितपावन असतो.



□ □

-८१-

देवाला स्मरून लढा

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्ध्य च । (८.७)

(म्हणून तू सर्वकाळ माझे स्मरण कर व युद्ध कर.)

सर्व जन्मभर मनुष्य ज्या गोष्टीचे सतत स्मरण करतो व त्याच ध्यासात असता मृत्यू पावतो, त्या गोष्टीची प्राप्ती त्याला मृत्यूनंतर होते. ईश्वराचे स्मरण जन्मभर केल्यास ह्याप्रमाणे त्या माणसालाही मेल्यावर ईश्वरप्राप्ती होईल-मोक्ष मिळेल.

ज्याने जन्मभर ईश्वराचे सतत स्मरण केले तो मनाने ईश्वरमय होणारच. म्हणून श्रीकृष्णाने अर्जुनाला हा उपदेश केला आहे.

' माझे स्मरण कर व लढ, ' असे का म्हटले आहे ? देवाचे नाव घेऊन आपण जे करतो ते पवित्र भावनेने देवासाठी म्हणूनच. मात्र ते कार्य कर्तव्य असावे लागते. स्वार्थी व दुष्टपणाच्या भावनेने केलेली कामे देवाची नव्हत. देवाला स्मरून अर्जुन लढणार म्हणून ते पाप होणारच नाही.

जन्मभर आपल्याला झगडावे लागते. ' रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग । ' असे तुकोबा म्हणतात. ह्या जीवनसंग्रामात देव पाठीशी असेल. कर्तव्या-साठी-सद्हेतूने आपण लढत असू तर आपल्याला पाप कसले लागणार ? कठोर कर्तव्ये ह्याच भावनेने ईश्वरास स्मरून करावी.



श्रद्धा तसा माणूस

श्रद्धामयोऽयं पुरुषो; यो यच्छ्रद्धः स एव सः । (१७.३)

(माणूस हा श्रद्धेने बनलेला असतो. जशी ज्याची श्रद्धा तसा तो असतो.)

प्रत्येक माणसाचा कशावर तरी दृढ विश्वास असतो. त्याचे महत्त्व त्याला फार वाटते. कोणाला स्वतःसाठी धन, कोणाला कीर्ती तर कोणाला आपले कर्तव्य, इतरांचे हित, हे श्रेष्ठ वाटते. ही त्याची श्रद्धा. हीस अनुसरून तो वागतो. चांगली श्रद्धा म्हणजे स्वतःबरोबर दुसऱ्यांचेही हित व्हावे, किंबहुना स्वतःचे हित बाजूस सारून इतरांच्या हितार्थ झटणे ही होय. चांगल्या श्रद्धेचा माणूस चांगला असतो. जशी ज्याची श्रद्धा तसा तो. माणसाच्या वागण्यात त्याची श्रद्धा उमटलेली असते. आपली श्रद्धा म्हणजेच आपण-आपले व्यक्तित्व.

आपण आपली श्रद्धा निवडली पाहिजे. **सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति ।** आपला स्वभाव, आपले विशेष गुण, ह्यांस अनुरूप अशी प्रत्येकाची श्रद्धा असते. कोणी धनपती, कोणी शास्त्रज्ञ, कोणी कलावंत, कोणी क्रीडापटू, कोणी कवी, तर कोणी समाजसेवक होईल.

आपली श्रद्धा पारखून, स्वतःला नीट ओळखून, त्याप्रमाणे आपल्या गुणांचा विकास केला व कार्य केले तर माणसाचे कार्य उत्कृष्ट होते व समाजाचा उत्कर्ष अधिक होतो. आपल्या व्यक्तित्वाचा विकास श्रद्धेच्या बळावर करावा, जीवनपुष्प उमलवावे व ते समाजाच्या चरणी वाहावे. हीच ईशसेवा, हेच कृतार्थ जीवन.

१०. ईश्वर

-८३-

जगाचा पिता

पिता असि लोकस्य चराचरस्य। (११.४३)

(हे ईश्वरा, तू ह्या सजीव-निर्जीव जगाचा पिता, म्हणजे पालनकर्ता आहेस.)

सारे प्राणी, सारे अचेतन पदार्थ ह्यांचे पालन पोषण करणारा ईश्वर हा पिता आहे. सर्व प्राणिमात्र इतकेच नव्हे तर सर्व सृष्टीतील सर्व पदार्थ, ही ईश्वराची लेकरे आहेत. पित्याच्या मायेने व काळजीने तो त्यांना पोसतो. त्यांचे अपराध सहन करतो.

श्रीकृष्णाने अर्जुनाला आपले भयंकर विश्वरूप दाखविले. मृत्यूचे रूपच होते ते. कौरवांसह सर्व प्राणी तो आपल्या अक्राळविक्राळ दाढांखाली चिरडीत होता. तेव्हा घाबरून अर्जुनाने 'तू जगाचा पिता आहेस. माझे अपराध सहन कर' अशी प्रार्थना केली आहे. स्वकर्म टाळणे हा त्याचा अपराध होता.



□ □

-८४-

जगाचा आधार

पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः । (९-१७)

अर्जुनाने जसे श्रीकृष्णाला पिता म्हणून आळविले तसे श्रीकृष्णानेही त्यापलीकडे जाऊन आधीच म्हटले होते की मी ह्या जगाचा पिता, माता, आधार व आजा आहे. लगेच 'मी या जगाचा स्वामी आहे, मित्र आहे, आश्रयस्थान व घर आहे' असेही म्हटले होते. परमेश्वर जगाशी सर्व नात्यांनी बांधलेला आहे—जगाचा सर्व बाजूंनी आधार आहे.

बलाची उपासना करा

बलं बलवताम् अस्मि। (७-११)

बलवान् माणसांमध्ये जे बळ आहे ते मी होय, असे श्रीकृष्ण म्हणतात. जे जे उत्तम ते देवाचे स्वरूप होय. म्हणून उत्तम बलाची पूजा करावी— ते बळ आपल्या अंगी आणण्याचा प्रयत्न करावा.

मात्र हे **बळ** 'कामरागविवर्जित' असावे, म्हणजे त्यात अयोग्य वासना, दुष्ट हेतू व चैनीची ओढ नसावी, असे श्रीकृष्णाने स्पष्टच सांगितले आहे. आपण मारुतीची पूजा करतो म्हणजे ह्याच सात्विक बलाची उपासना करतो मारुतीने बळाचा वापर स्वतःच्या सुखासाठी केला नाही. रामाची म्हणजे सत्याची सेवा केली. बुद्धी व तेजस्वीपणा हे देखील बलच होय. म्हणून 'बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्।' म्हणजे 'बुद्धिमतांची बुध्दी हा मी आहे, तेजस्वी स्वभावाच्या माणसांचे तेज हा मी आहे,' असे देव म्हणतो. हनुमान हा 'बुध्दिमतां वरिष्ठः' होता व त्याचा स्वभाव तेजस्वी होता. सूर्य ही बुध्दी व तेज यांची देवता होय. अग्निपूजा म्हणजे तेजाचीच पूजा होय. देव दुबळ्यांचा नाही. देवो दुर्बलघातकः।

राम हा बलवान होता, तेजस्वी म्हणजे प्रखर निश्चयाचा, सत्यवचनी व त्यागी होता. त्याने दुष्ट रावणावर शस्त्र धरले, म्हणून शस्त्र धारण करणाऱ्यांत मी राम आहे-रामः शस्त्रभृतामहम्' असे भगवान म्हणतात.

□ □

ईश्वर कोठे आहे ?

यद् यद् विभूतिमत् सत्त्वं श्रीमद् ऊर्जितमेव वा ।
तत् तद् एवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥ (१०-४१)

(जी जी वस्तू वैभव, लक्ष्मी व सामर्थ्य यांनी युक्त आहे, ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून उत्पन्न झाली असे तू निश्चित जाण.)

परमेश्वर जरी सर्व जगात सर्व वस्तूंत भरलेला आहे, तरी सर्व वस्तू काही सारख्या नाहीत. काही चांगल्या तर काही वाईट असतात, काही भव्य तर काही क्षुद्र, काही सुंदर तर काही ओंगळ असतात.

पण परमेश्वर—त्याचे सगुण रूप—हा सुंदर, भव्य, सामर्थ्यशाली, वैभवशाली असा आहे. म्हणून जे जे असे चांगले, सुंदर व शक्तिशाली असते तेथे परमेश्वराचे दर्शन घडते. ' मी हिमालय आहे, मी गंगा आहे ' असे भगवान म्हणतात.

भव्य पर्वत, सुंदर वनश्री, तेजस्वी सूर्य, महाबलशाली वारा, यांमध्ये मनुष्याच्या मनाला देव दिसतो व तो त्याची पूजा करतो. थोर पुरुषांत गुणवैभव असते, मनाचे मोठे सामर्थ्य असते म्हणून आपण त्यांना अवतारी पुरुष समजतो—देव मानतो. श्रीराम, श्रीकृष्ण, भगवान् बुद्ध, महात्मा येशू, गांधी, स्वामी विवेकानंद, संत तुकाराम महाराज, शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर हे असेच देवाचे अवतार मानून आपण त्यांची मंदिरे, पुतळे उभारतो.

-८७-

नरात नारायण

सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टः । (१५·१५) ।

(मी प्रत्येकाच्या हृदयात राहिलेलो आहे.)

ईश्वर प्रत्येक प्राण्यात आहे. या दृष्टीने मुळात सर्व प्राणी सारखे आहेत. या ईश्वराची म्हणजे चांगल्या गुणांची वाढ झाली की ह्या ना पुढील जन्मी प्राणी ईश्वरमय होईल.

देव देवळात नाही—आपल्या हृदयात आहे. तो नीट पहावा. जनी जनार्दन पहावा.

□ □



तुझे आहे तुजपाशी !

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ (१८·६१)

(हे अर्जुना, ईश्वर सर्व प्राण्यांच्या हृदयात राहत आहे व तो आपल्या मायेने सर्व प्राण्यांना चक्रात बसविल्याप्रमाणे फिरवीत असतो.)

सर्व प्राण्यांच्या हृदयात ईश्वर असतो. पण प्राणी अज्ञानी असतात. ही ईश्वराची माया होय. ह्या मायेमुळे आपण कोणी वेगळे आहो, देव नाही, आपले शरीर म्हणजे आपण इत्यादी भ्रमात प्राणी आपले जीवन जगत असतो. हृदयांतील ईश्वराला तो ओळखत नाही. देव शोधायला वणवण हिंडतो. ' तुझे आहे तुजपाशी । परि तू जागा चुकलासी ॥ ' असे तुकाराम महाराज म्हणतात.

□ □

-८९-

समोऽहं सर्वभूतेषु ।

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ (९·२९)

(मी सर्व प्राण्यांच्या बाबतीत सारखे वागतो. माझा कोणी नावडता नाही की आवडता नाही. पण जे भक्तीने माझा आश्रय घेतात ते माझ्यामध्ये व मी त्यांच्यामध्ये असतो.)

परमेश्वर माणसामाणसात भेद करीत नाही. ज्ञानी माणसांना, श्रीमंतांना, बलवंतांना, गुणवंतांना भेटावे व इतरांना जवळ येऊ देऊ नये, असा पक्षपात तो करीत नाही.

मग परमेश्वर सर्वांनाच भेटला पाहिजे. पण असे नाही. जो भक्ती करतो, परमेश्वरापाशी आसऱ्याला येतो, त्याला तो भेटतो. परमेश्वर भक्ताशी एकरूप होतो. भक्त देवात व देव भक्तात, असे ते एक होतात. यासच मोक्ष म्हणतात. कारण एकदा देवरूप झाला की माणूस परत पृथ्वीवर जन्म घेत नाही.

पापी माणूस असला तरी देव त्याला आपले दार बंद करीत नाही. पश्चात्ताप पावून तो अनन्य भक्ती करू लागला की तो सुधारला-साधू झाला असे म्हणून देव त्याला प्रेमाने भेटतो.

□ □

ये यथा माम् प्रपद्यन्ते ।

ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहम् ।
मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ (४.११)

(जे मला जसे शरण येतात तसेच मी त्यांना फळ देतो. हे पार्था, सर्व बाजूंनी माणसे अखेर माझ्याकडे येण्याचा मार्ग अनुसरत असतात.)

परमेश्वर उदार आहे. कोणत्याही मार्गाने भक्त त्याच्याकडे आले तरी त्यांच्या पात्रतेनुसार त्यांना तो फळ देतो. अमुक एकच वाट माझ्याकडे येण्याची आहे, असे तो म्हणत नाही.

माणसे आपापल्या पात्रतेनुसार किंवा आवडीनुसार ज्ञान, भक्ती किंवा कर्म, ह्या मार्गांनी ईश्वराकडे वाटचाल करतात. ईश्वरास शरण जाणे ही गोष्ट मात्र त्यांच्या सर्वांच्या मनात असते. तीच देवाला हवी असते. तुम्ही कोणताही धर्म पाळा, तुमचा धर्म-स्वभावधर्म पाळा. ईश्वरास स्मरून चांगले वागा, इतकीच देवाची अपेक्षा आहे. देव सर्व धर्म मानतो.

□ □

-९१-

देव सर्वांचा सखा

सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिम् ऋच्छति ॥ (५·२९)

(सर्व प्राण्यांचा प्रेमळ मित्र अशा मला जाणल्यावर माणूस शांती मिळवतो.)

मी सर्वांचा प्रेमळ मित्र आहे असे परमेश्वर म्हणतो. आपण जगाचे स्वामी आहो, असेही तो म्हणतो. पण तो इतका दयाळू व प्रेमळ आहे की प्राण्यांवर मालकी हक्क गाजविण्याऐवजी तो स्वतःला त्यांचा मित्र म्हणवतो. सर्व जगाचा पिता, असेही त्याने स्वतःला म्हटले आहे.

भक्त देवाशी जी सलगी करतात ती याच प्रेमाच्या नात्याने. देवाला ते मायबापा, सख्या, असे म्हणून आळवतात.

देव असा जवळ आल्यावर भक्ताची तळमळ शांत होते. चिरंतन सुख व शांती यांचा त्याला लाभ होतो. जगात दुसरे काही मिळावयाचे राहात नाही. जीवनातली धडपड, मनस्ताप, काळज्या व दुःखे नाहीशी होतात.

अशा प्रेमळ देवाशी एकरूप झालेला मनुष्य देवाप्रमाणे स्वतःही सर्वांना मित्र मानतो. त्याला कोणीही शत्रू वाटत नाही. तो शांत होतो.

–१२–

ईश्वरी अवतार

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ (४.७)

(हे भारता, अर्जुना, जेव्हा जेव्हा धर्माला उतरती कळा येते आणि अधर्म माजतो तेव्हा मी स्वतः स्वतःला जन्माला घालतो)

धर्म म्हणजे कर्तव्य—ते करण्याचा मार्ग. आपण जे करतो ते कर्म, तसे जे तत्त्व आपण मनाशी धरतो तो आपला धर्म. अर्थात् धर्म म्हणजे सद्धर्म.

अधर्म म्हणजे स्वार्थीपणा, दुष्टपणा, अन्याय, जुलूम, अनीती ह्या साऱ्या वाईट गोष्टी. ह्यांमुळे स्वतःचे व जगाचे नुकसान होते. धर्माने कल्याण होते. धर्म समाजाला आधार देतो. **धारणाद् धर्म उच्यते ।**

परमेश्वर सर्व जगाचे हित पाहणारा असतो. धर्म गळाला, अधर्म माजला म्हणजे जगातील लोक – विशेषतः गरीबगुरीब–गांजले जातात. मग त्या दीनदयाळ परमेशाला अवतार घ्यावा लागतो.

अलौकिक शक्तीचा सत्पुरुष म्हणजेच देवाचा अवतार. तो धर्माची घडी पुन्हा नीट बसवितो. धर्म जुनाट होत जातो. त्याची समजूत नव्या काळाला अनुरूप अशी नव्या भाषेत, नव्या रीतीने जगाला पटवून द्यावी लागते. नाना मतांनी गोंधळात पडलेल्या मानवास भगवान् श्रीकृष्णांनी वेद–वेदान्ताचे सार काढून धर्माची नवी मांडणी करून गीता सांगितली. श्रीरामाने सत्य, न्याय, प्रेम, प्रजावात्सल्य या धर्माचा आदर्श घालून दिला. भगवान बुद्ध, प्रभू येशू, महावीर, पैगंबर महंमद, हे सारे ईश्वराचे अवतारच. जे जे उत्तम त्यात ईश्वरी अंश असतो. श्रेष्ठ मानव हे देवाचे अवतारच.

ईश्वराचे अवतारकार्य

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ (४.८)

सज्जनांच्या रक्षणाकरिता, दुष्कृत्ये करणारांच्या नाशासाठी, आणि धर्माची स्थापना करण्याला मी प्रत्येक युगात अवतार घेतो.)

भगवान म्हणतात, ' हे अर्जुना, मी प्रत्येक युगात अवतार रूपाने ह्या जगात जन्म घेतो. मला सज्जनांचे रक्षण करावयाचे असते. त्यासाठी अधर्म नाश करावा लागतो. सज्जनांच्या हातून मला पृथ्वीवर धर्म स्थापित करावयाचा असतो. '

सज्जन माणसे आपला धर्म पाळतात– आपली कर्तव्ये करतात. ह्यामुळेच जगाचा गाडा सुरळीत चालत असतो. दुष्ट लोक अधर्म म्हणजे पाप करतात. सज्जनांचे त्यांच्यापुढे चालेनासे होते. म्हणून परमेश्वराला त्यांच्या मदतीस यावे लागते. दुष्टांचा नाश परमेश्वराशिवाय कोण करील ? परमेश्वर दयामय आहे. जगाच्या हितासाठी त्याला दुष्टांचा नाश करावा लागतो.

सज्जन म्हणजे ईश्वराचे अंश. दुष्टांना ते सुष्ट करतात. पण त्यांचे चालेनासे झाल्यावर ईश्वरास अवतार घ्यावा लागतो. हाती शस्त्र घ्यावे लागते.

महात्माजींनी सुधारलेल्या जगाला सत्याग्रहाचे शस्त्र दिले आहे. अहिंसेच्या तत्त्वावर लढण्याची युक्ती यशस्वी करून दाखविली आहे. दुष्टांचा हृदय-पालट करणे शत्रूला मित्र करणे, हेच जिंकणे होय. महात्माजी म्हणजे ईश्वराचे अवतारच होत.

-९४-

तद् धाम परमं मम ।

न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः ।
यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम ॥ (१५.६)
(त्या माझ्या चिरंतन ठिकाणाला सूर्य, चंद्र किंवा अग्नीही प्रकाशित करू शकत नाहीत. जेथे गेल्यावर-भक्त लोक-परत येत नाहीत ते माझे श्रेष्ठ निवासस्थान-परमधाम-होय.)

श्रीकृष्ण हा ईश्वराचा अवतार होता. ईश्वर सृष्टी उत्पन्न करतो. तो दयामय आहे. भक्तांवर प्रेम करतो, सर्व प्राणिमात्रांच्या हितार्थ दक्ष असतो. धर्म व सज्जन यांच्या रक्षणासाठी तो पृथ्वीवर अवतार घेतो. त्याचे दर्शन मूर्तिरूपाने घडते. हे ईश्वराचे सगुण म्हणजे सामर्थ्य, दया, प्रेम, सर्वव्यापी-पणा इत्यादि गुण असणारे स्वरूप.

परंतु ह्या ईश्वराचे – श्रीकृष्णाचे – मूळ ठिकाण परब्रह्म आहे. ते त्याचे परम धाम. परब्रह्म हे अमूर्त गूढ आहे. त्याचे वर्णन वेदांनाही करता येत नाही. 'जया वर्णिता शीणली वेदवाणी ।' त्याचा विचारही करता येत नाही. 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।' वाणी व मन यांस ब्रह्म न मिळून ती परत येतात. ब्रह्मस्वरूप होणे म्हणजे मोक्ष. तेथे चंद्रसूर्य नाहीत. पुन्हा जन्म घेऊन संसाराच्या दुःखात पडणे नाही.



□ □

जगाचा काळ

कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धो

लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः । (११.३२)

(मी लोकांचा नाश करणारा अवाढव्य ' काळ ' आहे, आणि
येथे लोकांचा संहार करू लागलो आहे.)

भारतीय युद्धात लक्षावधी वीर मरण पावणार होते. अर्जुन लढला नसता तरी ते मरण पावले असतें. त्यांचा काळच ओढवला होता. युद्ध म्हणजे काळच. ईश्वराचे ते भयंकर रौद्ररूपच.

अर्जुनाच्या इच्छेवरून श्रीकृष्णाने आपल्या विश्वरूपाचे त्याला दर्शन दिले. अखिल विश्वरूप जो ईश्वर त्याचे हे जगडव्याळ रूप फार भयंकर होते.

सारे लोक त्या कालपुरुषाच्या दाढेत चिरडले जात होते. कोट्यवधी सूर्यासारखे ज्वलंत असे ते रूप होते. ॲटम् बॉम्बचा स्फोट झाल्यावर असेच दृश्य दिसले होते ते बॉम्ब टाकणाऱ्या वैमानिकाला.

वीरश्रेष्ठ अर्जुनही ते पाहून घाबरला. पूर्वीचे तुमचे रूप दाखवा, अशी प्रार्थना त्याने केली. कौरवांनी आपले मरण आपणच ओढवून घेतले आहे, हे त्याला पटले. मरायला निघालेल्याला ईश्वर वाचवीत नाही.

ईश्वर हा सर्व प्राणिमात्रांच्या हितात मग्न असतो. तो दयामय आहे. पण तो स्वतंत्र नाही. निसर्गाच्या नियमानुसार, आपल्या कर्मानुसार, माणसे जन्मतात- मरतात. ईश्वराची इच्छा म्हणजे निसर्गाचा नियम. निसर्ग म्हणजे माया-एक देखावा. ईश्वराला म्हणजे त्याच्या परम तत्त्वास कशाचे सुख नाही की दुःख नाही.

११. सुख व सदाचार

–९६–

खरे सुख कोणते ?

यत्तद् अग्रे विषमिव परिणामे अमृतोपमम् ।
तत् सुखं सात्त्विकं प्रोक्तम् आत्मबुद्धिप्रसादजम् ॥
(१८.३७)

(जे आरंभी विषासारखे पण परिणामी अमृतासारखे वाटते व ज्यापासून आत्म्याची व बुद्धीची प्रसन्नता उत्पन्न होते ते सुख सात्त्विक म्हणजे चांगले म्हटले आहे.)

जे सतत टिकून राहील तेच खरे सुख. ते मिळविण्यासाठी आधी कष्ट भोगावे लागतात. खरे सुख सुखासुखी मिळत नाही. दुःखानंतर मिळालेल्या सुखाची गोडी वेगळीच. उन्हातून सावलीत जाणाराला सावलीचे सुख समजते. 'सुखं हि दुःखानि अनुभूय शोभते।' असे मृच्छकटिकातील चारुदत्त म्हणतो.

अभ्यास सुरवातीला विषासारखा कडू वाटतो. पण नंतर परीक्षेत यश मिळाले, व्यवसाय चांगला मिळाला, समाजात प्रतिष्ठा मिळाली की जन्मभर सुख मिळते. याउलट, आळस, झोप, उनाडक्या यामध्ये आनंद वाटतो पण पुढे सारा जन्म दुःखात जातो. पक्वान्नांवर ताव मारताना बरे वाटते पण पुढे ते निस्तारावे लागते. म्हणून अशा क्षणिक सुखांच्या मागे लागू नये.

क्षणिक सुखांनी केवळ इंद्रियांना आनंद वाटतो. तो आनंद वरवरचा. आत्मा व बुद्धी यांच्यापर्यंत पोचलेला आनंद हे खरे सात्त्विक–टिकाऊ सुख. कर्तव्य केल्याने ते मिळेल.

९००
-१५-
किशोर 3९६

सुखाचे मूळ

सत्त्वं सुखे संजयति । (१४.९)

(सुखाची आसक्ती सत्त्वगुणामुळे– म्हणजे उत्तम गुणामुळे–होते.)

मनुष्याला, किंबहुना प्रत्येक प्राण्याला, सुखाची ओढ असते. दुःख कोणाला नको असते. सुखासाठी धडपड केली नसती तर प्राणी जगूही शकला नसता. जीवन्मुक्त हे सामान्य सुखापलीकडे गेलेले असतात. सुख हा जीवनाचा गाभा आहे. सुख म्हणजे आनंद, व परमेश्वर तर आनंदरूप आहे. ईश्वराची भक्ती करून त्याच्याशी समरस होणारांना 'सुखाचे हे सुख' मिळते. हे आत्यंतिक सुख.

आपण सुखकारक आठवणी जपून ठेवतो व दुःख विसरतो. कारण, जगात सुख हीच चांगली गोष्ट आहे व तीच टिकून राहते. मात्र, स्वतःच्या सुखासाठी इतरांना दुःख देता कामा नये. स्वार्थीपणा हा सत्त्वगुण नाही. इतरांचे सुख तेच आपले सुख व तेच सात्त्विक, कायम टिकणारे उच्च सुख.

दुसऱ्यांचा फायदा त्यापासून नसताही जे लोक निष्कारण स्वताचे हाल करून घेतात ते त्यांचे अज्ञान होय. तो तामसीपणा आहे. आपण स्वार्थ व परमार्थ दोन्ही साधावे. परमार्थात स्वार्थ पहावा. खऱ्या सुखाचा हा मार्ग आहे.

□ □

देवांची संपत्ती

अभयं सत्त्वसंशुद्धिः; ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च; स्वाध्यायस्तपः आर्जवम् ॥ १६.१ ॥

अहिंसा सत्यमक्रोधस्, त्यागः शांतिर् अपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं, मार्दवं ह्रीः अचापलम् ॥२॥

तेजः क्षमा धृतिः शौचम् , अद्रोहो नातिमानिता ।
भवन्ति सम्पदं दैवीम् अभिजातस्य भारत ॥ ३ ॥

(हे अर्जुना, निर्भयपणा, शुद्ध सात्त्विक वृत्ती, ज्ञानाविषयी दृढ निष्ठा, दान करणे, इंद्रियदमन करणे, यज्ञ करणे, वेदाभ्यास व तप करणे, मनाचा सरळपणा, ॥ १ ॥

अहिंसाव्रत, सत्यव्रत, क्रोध न करणे, त्याग, शान्त वृत्ती, सज्जनपणा, प्राणिमात्रांवर दया, निर्लोभीपणा, मनाचा कोमलपणा, वाईट वर्तन करण्याची लाज, स्थिर बुद्धीने वागणे, ॥ २ ॥ तेजस्वी वृत्ती, क्षमाशीलता, धीरवृत्ती, शुद्ध आचरण, दुसऱ्याचा द्वेष न करणे, हे गुण देवांच्या संपत्तीचा वारसा घेऊन जन्म मिळालेल्या माणसांचे असतात. ॥ ३ ॥)

देवांना शोभणारे हे गुण म्हणजे धनच. चांगली माणसे ही गुणसंपत्ती घेऊन जन्मतात. प्रयत्नानेही हे गुण अंगी येतील.

असुरांची संपत्ती

दंभो दर्पो अभिमानश्च क्रोधः पारुष्यम् एव च ।
अज्ञानं च अभिजातस्य पार्थ संपदम् आसुरीम् ॥ (१६.४)

(हे पार्था, ढोंगीपणा, गर्विष्ठपणा, अभिमान, रागीटपणा, कठोरपणा व अज्ञान हे गुण असुरांच्या संपत्तीचा वारसा घेऊन जन्मलेल्या माणसाचे असतात.)

काही माणसे जन्मापासून वाईट स्वभावाची असतात. त्यांच्यातले वाईट गुण ही असुरांची वृत्ती होय. कसे वागावे, कसे वागू नये, हे त्यांना समजत नाही. शुद्धता, सदाचार, सत्य ही त्यांच्यामध्ये नसतात. हे जग खोटे आहे, जगाला आधार नाही, जगात ईश्वर नाही व केवळ चैन करण्यासाठी हे निर्माण झाले आहे, असे हे लोक म्हणतात.

ह्या कोत्या बुद्धीमुळे माणुसकी नष्ट होऊन हे लोक भयंकर कृत्ये करून जगाचा नाश करावयास प्रवृत्त होतात. मानवतेचे हे शत्रूच होत.

हे आसुरी लोक अज्ञानामुळे असत्य मतांचा स्वीकार करून अपवित्र आचरण करतात. यांची चैन कधी संपत नाही. चैन हेच सर्व काही आहे, असे समजून ते जन्मभर चैनीच्याच काळजीत असतात. आशेने ते जखडलेले असतात. राग व लोभ यांच्या आहारी जाऊन ते आपल्या चैनीसाठी अन्यायाने धन साठवू पहातात. एकामागून एक शत्रूंना मारण्यात त्यांना पराक्रम वाटतो.

हे दुर्गुण जन्मापासून नसून पुढे वाईट संस्कारांमुळे येतात, असे आता शास्त्राने सिद्ध झाले आहे. जन्मतः येणारे जे दोष ते हे नसतात.

खरे तप कोणते ?

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तपः उच्यते ॥ (१७.१५)

(दुसऱ्याला दुःख किंवा तिरस्कार न वाटेल असे खरे व प्रिय असूनही हिताचे भाषण व वेदमंत्रांचे पठन, ह्याला वाचेचे तप म्हणतात.)

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनम् आत्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिर् इत्येतत् तपो मानसम् उच्यते ॥ (१७.१६)

(मनाची प्रसन्नता, सौम्यपणा म्हणजे शांतता, कमी बोलणे व सतत विचार करणे, आपल्या मनावर ताबा ठेवणे, मनात शुद्ध हेतू बाळगणे, याला मनाचे तप म्हटले जाते.)

अरण्यात जाऊन शरीराला पीडा देणे, हे तप नव्हे. उलट शरीरातील देवाला ते पीडा देणे होय. दुसऱ्याच्या नाशार्थ तप हे तर उग्रच. ही तपे तामसी होत.

अहिंसा, स्वच्छता, सरळ वागणे हे खरे शरीराचे तप. दररोज सर्वसामान्य माणसाने शरीर, मन व वाणीने जे सदाचरण करावयाचे तेच खरे तप. प्रत्येकाने असे तपस्वी बनले पाहिजे. आपल्याला व दुसऱ्याला सुख व शांती यांचा लाभ व्हावा, ह्या दृष्टीने हे दैनंदिन तप प्रत्येकाने केल्यास जगात सुख व शांतता ही नांदतील. ह्यानेच सर्व जीवन तपोमय होईल व मानवी जीवनाचे सार्थक होईल. सामान्य माणसाने दररोज करावयाचे असे हे तप आहे.

-१०१-

आहार कसा असावा ?

आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिराः हृद्याः आहाराः सात्त्विकप्रियाः ॥
(१८.८)

(आयुष्य, सात्त्विक वृत्ती, बळ, आरोग्य, सुख व संतोष ही वाढविणारे, रसाळ, स्निग्ध, दमदार व हृदयास हितकारक असे आहार सात्त्विक माणसांना आवडतात.)

आपण खाण्यासाठी जगत नाही, तर जगण्यासाठी खातो. म्हणून दीर्घायुषी करील असा आहार हा सात्त्विक होय. सत्त्व म्हणजे चांगुलपणा. मनाला चांगले बनविणारे आहार सात्त्विक होत.

मन म्हणजे शरीराचा भागच होय. मेंदू निरोगी व बळकट असेल तरच चांगले विचार मनात येतील व धैर्य, निष्ठा, संयम, इत्यादि गुण मनात निर्माण होतील. A sound mind in a sound body.

सकस आहाराने बळ वाढते. शरीर सुखी तर मन सुखी. भेळ, चिवडा, तिखट व मसालेदार पदार्थ, मद्य, मांस हे आहार सात्त्विक नाहीत.

रसाळ फळे, दूध, लोणी, तूप, दही, ताक, दमदार धान्ये, डाळी इ. आहार सात्त्विक होत. पक्वान्ने गोड लागतात, पण ती खाल्ल्यावर सुस्ती येते. सुख वाटत नाही. फार पक्वान्ने खाणारांना मधुमेह, हृद्रोग इ. जडतात व ते दीर्घायुषी होत नाहीत. शरीरम् आद्यं खलु धर्मसाधनम्। ते शरीर म्हणजे धर्माचे साधन चांगले राखणे हा धर्म होय.

स्वार्थीपणा हे पापच !

भुंजते ते तु अघं पापा ये पचन्ति आत्मकारणात् ।
(३.१३)

(जे पापी लोक केवळ स्वतःसाठी अन्न शिजवितात ते केवळ पापच खातात.)

केवळ आपल्यासाठी मिळविणे व खाणे हे पाप होय. आपल्याला जे अन्न मिळते ते पावसाच्या कृपेने. पाऊस म्हणजे इंद्रदेव. इंद्राला सूर्याची, वायूची मदत असते. वरुण म्हणजे ढगातील, समुद्रातील जलाची देवता. हे देव म्हणजे निसर्गाची रूपे होत. निसर्गाकडून आपल्याला अन्न मिळते.

आपण निसर्गाचे हे ऋण मानून ते फेडले पाहिजे. ज्याचे त्याला परत दिले पाहिजे. नाहीतर आपण कृतघ्न-पापी ठरू.

यज्ञात अन्नाच्या आहुती देऊन हे ऋण फेडीत असत. त्यामुळे देवता प्रसन्न होत. ही देवाण-घेवाण म्हणजे यज्ञचक्र. यज्ञात दाने देत व त्यामुळे साचलेल्या धनाची वाटणी होई. समाजाचे ऋण फिटे. हे चक्र जगाचे जीवन चालावे म्हणून ईश्वराने चालू केले आहे. यज्ञ थांबला तर सृष्टीचे चक्र थांबले.

हे यज्ञचक्र चालू न ठेवणाराचे जीवन स्वार्थी पापमय असते. तो इंद्रियांच्या सुखातच केवळ रमणारा. तो व्यर्थ जगतो. '**अघायुः इंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ।**' (३.१६)

यज्ञ म्हणजे त्याग. समाजातील संस्थांचे कार्य म्हणजे आजचे यज्ञच. त्यागमय जीवन हेच खरे जीवन. 'दुसऱ्यासाठी जगलास तरच जगलास.' जेवणापूर्वी काकबली देत. निदान चार शिते बाजूला टाकीत. प्राणिमात्रांत देव आहे. त्याला प्रथम द्यावे व मग आपण खावे. ही सर्वोदयाची दृष्टी होय.

-१०३-

दान कसे असावे ?

दातव्यम् इति यद् दानं दीयते अनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद् दानं सात्त्विकं स्मृतम् ॥
(१७.२०)

(देणे हे आपले कर्तव्यच आहे असे म्हणून आपल्यावर उपकार न करणाऱ्याला व देण्यास पात्र अशाला योग्य जागी, योग्य वेळी जे दिले जाते, ते दान उत्तम सांगितले आहे.)

दान देणे म्हणजे दुसऱ्यावर उपकाराचे ओझे टाकून त्याला मिंधे करणे नव्हे. दुसऱ्याचे हित पाहणे हे आपले कर्तव्यच आहे. त्यात आपण काही विशेष करतो, हा अभिमान धरण्याचे कारण नाही. तसेच, ज्याने आपले काही काम केले किंवा करील म्हणून देणे हा मोबदला होईल-दान नव्हे.

अर्थात् उपकाराची परतफेड करावयास हवीच. समाजाचे ऋण म्हणून श्रीमंतांनी दान केलेच पाहिजे. पण ते मध्यम—सामान्य प्रतीचे—दान होते. दान करायचे ते सत्कार करून करावे. दान घेणाराला त्यात कमीपणा वाटू नये. दान वेळीच करावे. वेळ निघून गेल्यावर दान काय कामाचे ? वरातीमागून उशीरा आणलेल्या घोड्याचा काय उपयोग ? आळशी भिकाऱ्यांना दान देणे व देताना त्यांचा अपमान करून देणे हे तामसी-हीन प्रकारचे दान. अशा दानाने जगाचे हित होणार नाही. दान संतोषाने द्यावे. सक्तीने नव्हे. दान करताना मन कष्टी नसावे. दान हा धर्म आहे, त्यात पुण्य आहे.

कीर्ती हेच जीवन !

संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते । (२.३४)

(समाजात मानल्या गेलेल्या माणसाला दुष्कीर्ती ही मरणाहून अधिक वाईट होय.)

समाजात आपली मानमान्यता व्हावी असे प्रत्येकाला वाटते. ह्या इच्छेमुळे तो समाजहिताची कामे करतो. ' जनी वंद्य ते सर्व भावे करावे ' असे रामदास स्वामी म्हणूनच सांगतात.

माणूस हा केव्हातरी मरणारच. मरणाची भीती सोडावी. कीर्ती करून अमर व्हावे. मरणावर मात करावी. ' मरावे परी कीर्तिरूपे उरावे ' असा उपदेश समर्थ रामदास करतात. कीर्तीचे मोल सर्वांत अधिक आहे. धन गेले तर ते पुन्हा मिळेल. पण नाव गेले तर ते कायमचे गेले. अब्रू ही काचेसारखी असते. अब्रूला प्राणापलीकडे जपले पाहिजे. आपले आई-वडील, मित्र, शेजारी, गुरुजन ह्यांनी आपल्याला चांगले म्हणावे यासाठी झटावे. सोपे आहे ते. मरणाची किंमत नाही द्यावी लागत त्यासाठी. कष्ट घ्यावे. कष्टाने माणूस मरत नाही. ज्यांनी प्राणाचे मोल देऊन धर्म, देश, इतरांचे प्राण वाचविले, त्यांना जग कधीही विसरत नाही. मरणाला मारून हे हुतात्मे अमर होतात ते असे. ' स्मरणात खरोखर जग जगते ' असे आचार्य अत्रे म्हणतात.

-१०५-

संशयात्मा विनश्यति ।

अज्ञश्च अश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति । (४.४०)

(स्वतः अडाणी, तरी जो श्रद्धा बाळगीत नाही, असा संशयग्रस्त माणूस नाश पावतो.)

माणसाला एकतर ज्ञान हवे, नाहीतर त्याला श्रद्धा तरी हवी. माणूस श्रद्धेवर जगतो. कोणावर नसली तरी स्वतःवर श्रद्धा हवी. आत्मविश्वास हवा. पूर्ण जीवनाला ज्ञान व श्रद्धा दोन्ही हवी. अंधश्रद्धेमुळे भलतेच वर्तन होते. डोळस श्रद्धा स्वतःच्या व इतरांच्या कल्याणाचा मार्ग दाखविते.

संशय हे पिशाच आहे म्हणतात. संशयाने माणूस झपाटला की त्याचा नाश झालाच समजा. देवासारखा संशयाचा छेद करणारा—ज्ञान देणारा—दुसरा कोणी नाही. अर्जुन म्हणतो, ' हे देवा, तुझ्यावाचून दुसरा कोणी ह्या माझ्या संशयाचा नाश करणारा मिळणार नाहीच. ' ' त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न हि उपपद्यते । ' (६.३९)

□ □

१२. माया

—१०६—

मम माया दुरत्यया । (७.१४)

(माझी माया तरून जाण्यास कठिण अशी **आहे.**)

ईश्वराने हे जग आपल्या मायेने निर्माण केले आहे. माया म्हणजे ईश्वराची योगशक्ती—योगमाया. ही ईश्वराची प्रकृती—स्वभाव होय. हाच निसर्ग. ह्या शक्तीमुळे जगात नाना प्रकारचे निरनिराळ्या गुणांचे पदार्थ उत्पन्न झाले आहेत. ही माया ‘ गुणमयी ’ आहे. सत्त्व, रज, तम, हे ते तीन गुण. उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे भेद प्रत्येक पदार्थांत कमीजास्त प्रमाणात असतात. चांगले-वाईट, सुंदर-कुरूप, सुख-दुःख, मान-अपमान, हर्ष-खेद, राग-प्रेम इत्यादि जोड्या जीवनात असतात. त्या अनुभवांनी आपले जीवन बनलेले असते.

हे भेद न मानणे म्हणजे ‘ गुणातीत ’ होणे—गुणांच्या पलीकडे जाणे. सर्वत्र ईश्वर आहे, आपण ईश्वर आहो, ही समत्वभावना दृढ झाली की ती माणसे योगी होतात. ते मायानदी तरून जातात. ‘ **मायाम् एतां तरन्ति ते ।** ’ (७.१४)

ही समत्वभावना निर्माण होण्यासाठी ईश्वरासच शरण गेले पाहिजे. भक्ती हाच मुक्तीचा उपाय होय. नुसते कोरडे ज्ञान किंवा धर्मकृत्ये उपयोगी पडणार नाहीत. आपली कर्तव्ये करणे हीच ईश्वराची खरी भक्ती होय. हाच कर्मयोग. ह्यामुळेच जीवनाचे सार्थक होईल. माया तरून जाणे म्हणजे असे कृतार्थ होऊन पूर्णत्वाला जाणे.

‘ जग म्हणजे केवळ माया आहे, कशात काही अर्थ नाही, सारे खोटे आहे ’, असे म्हणून स्वस्थ बसणे योग्य नव्हे. जीवनाच्या लढाईतून ते पळून जाणे ठरेल. खेळ खोटा म्हणून तो कसातरी खेळून कसे चालेल ? सारी शक्ती व युक्ती खर्चून तो खेळलाच पाहिजे.

जीवनाच्या संग्रामात शौर्य गाजवा, हा गीतेचा स्फूर्तिदायक संदेश आहे.

ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ...५००... दिनांक

गीतेतील सुभाषिते

१. क्लैब्यं मा स्म गमः । (२.३)
नेभळट बनू नकोस.

२. अंतवंतः इमे देहाः । (२.१८)
ही शरीरे नाशवंत आहेत.

३. तस्माद् अपरिहार्ये अर्थे न त्वं शोचितुमर्हसि । (२.२७)
म्हणून अटळ गोष्टीबाबत तू शोक करणे योग्य नाही.

४. हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम् । (२.३७)
किंवा (लढता लढता) मेलास तर स्वर्ग प्राप्त करशील.

५. व्यवसायात्मिका बुद्धिः एका इह । (२.४१)
निश्चयी बुद्धी ही एक असते–द्विधा होत नसते.

६. दूरेण हि अवरं कर्म बुद्धियोगात् । (२.४९)
बुद्धीवाचून नुसते कर्म अतिशय खालच्या दर्जाचे होय.

७. दुःखेषु अनुद्विग्नमनाः । (२.५६)
दुःखाच्या प्रसंगी जो दुःखी होत नाही (तो स्थिर बुद्धीचा).

८. जोषयेत् सर्वकर्माणि । (३.२६)
लोकांना सर्व कामांची गोडी लावावी.

९. निग्रहः किं करिष्यति । (३.३३)
बाह्य दडपणाचा काय उपयोग ?

१०. यो बुद्धेः परतः तु सः । (३.४२)
जो बुद्धीच्या पलीकडे आहे, तो (परमेश्वर).

११. संशयात्मा विनश्यति । (४.४०)
संशयी माणूस नाश पावतो.

१२. न आदत्ते कस्यचित् पापं न चापि सुकृतं विभुः ।(५.१५)
ईश्वर कोणाचे पाप घेत नाही की पुण्य घेत नाही.

१३. न प्रहृष्येत् प्रियं प्राप्य । (५.२०)

हवे ते मिळाल्यावर हर्षाने हुरळून जाऊ नये.

१४. आत्मा एव हि आत्मनो बंधुः; आत्मा एव रिपुः आत्मनः । (६.५)

आपणच आपले नातेवाईक व आपणच आपले शत्रू.

१५. न अत्यश्नतः तु योगोऽस्ति । (६.१६)

अधाशी–लोभी माणसाला योग–खंबीर मन–प्राप्त होत नाही.

१६. चंचलं हि मनः । (६.३४)

मन हे स्वभावतः चंचलच असते.

१७. न मे भक्तः प्रणश्यति । (९.३१)

माझा (देवाचा) भक्त नाश पावत नाही.

१८. ज्ञानं ज्ञानवताम् अहम् । (९.३८)

ज्ञानी माणसाचे ज्ञान, तो मी (ईश्वर) आहे.

१९. मय्येव मनः आधत्स्व । (१२.८)

मच्चित्तः सततं भव । (१८.५७)

माझ्या (ईश्वराच्या) ठिकाणीच मन ठेव. सतत माझे चिंतन कर.

२०. यथेच्छसि तथा कुरु । (१८.६३)

तुला वाटेल (पटेल) तसे कर. ऐकावे जनाचे, करावे मनाचे.

२१. कर्म ज्यायो हि अकर्मणः । (३.८)

स्वस्थ बसण्यापेक्षा काम करणे चांगले.

२२. करिष्ये वचनं तव । (१८.७३)

हे देवा, मी तुझ्या सांगण्याप्रमाणे वागेन.

श्लोकांची सूची

अध्याय	श्लोक	पान	अध्याय	श्लोक	पान
अ. १	३५	५	अ. ३	१९	४४
अ. २	१३	१४	,,	२०	४५
,,	१९	११	,,	२५	४६
,,	२२	१२	,,	२६	४७
,,	२३	१३	,,	३३	५७
,,	२७	१५	,,	३५	६२
,,	३१	८	,,	४३	१९
,,	३४	१०८	अ. ४	७	९६
,,	३७	९	,,	८	९७
,,	३८	२२	,,	११	९४
,,	४०	५३	,,	१३	६०
,,	४७	३६-३७	,,	१६-१७	५६
,,	४८	२३	,,	३४	६५
,,	४९	३८ व ७४	,,	३५-३८	६४
,,	५०	४८	,,	३९	६६-६७
,,	५५	२६	,,	४०	१०९
,,	६०-६१	१७	अ. ५	२	५१
,,	६३	७५	,,	१४-१५	५८
,,	६५	७६	,,	२२	१७
,,	६६	७७	,,	२५	३२
,,	६९	२०	,,	२९	९५
,,	७१	२४	अ. ६	५	१६
अ. ३	६	१८	,,	८	२५
,,	८	३५	,,	१७	२१
,,	१३-१६	१०६	,,	२०-२२	२४

अध्याय	श्लोक	पान
अ ६.	३०	८३
,,	३२	२७
,,	३९	१०९
,,	४०	५२
अ. ७	११	८९
,,	१४	११०
,,	१७	७०
अ. ८	७	८५
अ. ९	१७	८८
,,	२२	८५
,,	२६	७८
,,	२९	९३
,,	३०	८४
अ. १०	८	९३
,,	१०	१६
,,	३२	९९
,,	४१	९०
अ. ११	३२	९९
,,	४३	८७
अ. १२	४	२८
,,	१०	५४
,,	१२	७१
,,	१३-१४	३१
,,	१५	३०
,,	१८	३४
,,	१९	२९

अध्याय	श्लोक	पान
अ. १४	९	१०१
,,	१७	६८
,,	२४-२५	३३
अ. १५	६	९८
,,	१५	९१
अ. १६	१-३	१०२
,,	४	१०३
,,	२१	१९
,,	२४	६१
अ. १७	३	८६
,,	१५-१६	१०४
,,	७८	१५
,,	८४	२०
,,	२०	१०७
अ. १८	५	३९
,,	८	१०५
,,	९	४०
,,	१०	४२
,,	११	४१
,,	१४	४३
,,	२०	६९
,,	३७	१००
,,	४३	६-७
,,	४५	६३
,,	४६	५५
,,	४८	४९-५०
,,	५४	८०

अध्याय	श्लोक	पान	अध्याय	श्लोक	पान
अ. १८	५५	७९	अ. १८	६६	८२
,,	५९	५९	,,	६७	७३
,,	६१	९२	,,	७०	७२
,,	६५	८१	,,	७८	१०

शुद्धिपत्रक

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५	६	आम्हाला	आम्हांला
११	३	**ना**	**न**
१३	४	श्लोकाचे शेवटी वाचा	(२.२३)
१६	१२	योगंतम्।	योगं तम्।
१७	१७	...योनय्	...योनयः
३६	३	ओळीचे शेवटी वाचा	(२.४७)
४०	४	सात्विको	सात्त्विको
४०	४	ओळीचे शेवटी वाचा	(१८.९)
४१	८	दूसऱ्यासाठी	दुसऱ्यासाठी
४५	३	(१.२०)	(३.२०)
५२	१७	स्वल्पमम....	स्वल्पम....
५९	५	(७८.५९)	(१८.५९)
६१	३	ज्ञास्त्रं	शास्त्रं
६८	शेवटची	सद्वतनी	सद्वर्तनी
७२	११	मायाद	मयाद्
७४	४	बुद्धा	बुद्धौ
८६	३	यच्छ्रद्धः	यच्छ्रद्धः
,,	,,	१७.२	१७.३
९४	४	वत्म	वर्त्म

एणें वाग्यज्ञें तोषावें ।



प सा य दा न

खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवाचें ॥

—संत ज्ञानेश्वर



ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

BVBK-0400900